# जावजी दादाजी चौधरी ह्यांचें चरित्र.

हें

… कोंडदेव ओक

…ांनीं लिहिलें.

च
4७१

भलारे भला बोलती तें करावें
बहूता जनांचे मुखें येश घ्यावें
परी शेवटीं सर्व सोडोनि द्यावें
…रीं कीर्तिरूपें उरावें.

रामदास.

मुंबईत
जावजी दादाजी यांच्या
निर्णयसागर छापखान्याचे मालक तुकाराम जावजी
यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सन १८९२.

[illegible]

हें लहानसें चरित्र

**कैलासवासी जावजी दादाजी शेट**

ह्यांच्या

**सर्व सुज्ञ परिचितांस**

**प्रेमपूर्वक**

**अर्पण केलें आहे.**

# प्रस्तावना.

पुस्तक ह्मटलें कीं त्याला प्रस्तावना पाहिजे, असें झालें आहे. तें बरें आहे. त्यांत पुस्तकाविषयीं आणि आपणा स्वतःविषयीं ग्रंथकारास कांहीं विशेष सांगावयाचें असल्यास सांगतां येतें.

हें पुस्तक मीं कशाकरितां लिहिलें आहे, हें पहिल्या भागांत थोडक्यांत, "विषयाचें अभिनंदन" करून सांगितलें आहे. पण, त्या संबंधानें एक गोष्ट सांगावयाची राहिली आहे. ती सांगण्यास तेथें यथायोग्य प्रसंग सांपडला नाहीं. ह्मणून ती येथें सांगतों. ती गोष्ट ही कीं, जावजी शेट हे माझे परममित्र होते. त्यांचा माझा स्नेहसंबंध अकरा वर्षें, अविच्छिन्न, मध्यंतरीं तिळभरही विपर्यास न येतां, चालला होता. आणखी शिवाय ते माझे आश्रयदाते होते. तेव्हां, त्यांचे सद्गुण तेवढे मात्र—तिळाएवढे असले तरी पर्वताएवढे होऊन—मला दिसावे, आणि त्यांचे आंगचे दुर्गुण—जर कांहीं असले तर—मला मुळींच न दिसावे, हें साहजिक आहे. ह्यांत मनुष्यवृत्तीस विसंगत असें कांहीं नाहीं. हें तत्त्व मनांत आणून ह्या लहानशा पुस्तकाचें अवलोकन करावें, आणि जर अशा प्रकारचे कांहीं प्रमाद घडले असले, तर त्यांबद्दल मला क्षमा करावी, अशी माझी वाचकांस प्रार्थना आहे. ही ते कृपा करून पूर्ण करोत.

# अनुक्रमणिका.


| भाग. | विषय. | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| पहिला | —विषयाचें अभिनंदन. ... ... ... ... ... | १ |
| दुसरा | —जन्म आणि बाळपण. ... ... ... ... ... | ५ |
| तिसरा | —उद्योग. ... ... ... ... ... ... ... | १३ |
| चवथा | —औदार्य. ... ... ... ... ... ... ... | २३ |
| पांचवा | —विचार आणि आचार.... ... ... ... ... | ३३ |
| साहावा | —शेवटचे दिवस आणि अंतकाल. ... ... ... | ४७ |
| सातवा | —त्यांविषयीं "लोक काय बोलतात." ... ... ... | ५५ |

SATARA
NATIVE GENERAL
LIBRARY
Case ..... No. .....

# जावजी दादाजी चौधरी ह्यांचें चरित्र.

## भाग पहिला.

### विषयाचें अभिनंदन.

सत्पुरुषकथा अद्भुत
रसदा ह्मणतों इलाच सुरभी मी.

मोरोपंत.

सदा प्रीती चित्तीं विनय मधुरा वाणिहि सदा
स्वभावें कल्याणी मति परिचया भेद न कदा
पुढें किंवा मागें मनिं रसविपर्यास नसती
चरित्रें साधूंचीं अकपट विशुद्धेंचि असती.

भवभूति.

इतिहासपुराणांचा विचार केला असतां असें दिसून येतें कीं, त्यांत जें काय अमृतासारखें गोड आहे, आणि जें काय सज्जनांस अत्यंत प्रिय वाटतें, तें सगळें सद्गुणांचें वर्णन आहे. ह्याचें कारण विश्वरचनेंत गर्भित

झालेलें आहे. तें कारण हें कीं, जगामध्यें जो काय सद्गुणसंचय आहे, तो सगळा परमेश्वराचा अंश आहे. अथवा, सगळ्या सद्गुणांच्या संमेलनाची जी एक मूर्ति, तिलाच तत्त्ववेत्ते परमेश्वर ह्मणतात. तेव्हां, सद्गुणांचें वर्णन हें, परमेश्वराचें भजन आहे, असें झालें. ह्मणूनच तें विचारशीलांस अत्यंत आल्हादकारक वाटतें. पुराणांत काय आणि इतिहासांत काय, सद्गुणी आणि दुर्गुणी अशा दोन्ही प्रकारच्या व्यक्तींचा संबंध येतो; आणि त्या दोन्ही प्रकारच्या व्यक्तींचें वर्णन करावें लागतें. पण, त्यांत दुर्गुणी माणसांच्या वर्णनापेक्षां सद्गुणी पुरुषांचा महिमा पुष्कळ अधिक गाइलेला असतो. तो एवढ्याच करितां कीं, तें एकेप्रकारें परमेश्वरभजन असल्याकारणानें त्याच्या योगानें अंतःकरणास आनंद होऊन चित्तशुद्धि होते. ह्यास प्रमाण अगदीं आलीकडचें एक चांगलें ठळक सांगतों ह्मणजे पुरे. अर्वाचीन इतिहासामध्यें जार्ज वाशिंग्टन आणि नेपोलियन बोनापार्ट हीं दोन नांवें फार मोठीं आहेत. हीं नांवें कानीं पडल्याबरोबर, मान तुकावणार नाहीं असा एक देखील सुशिक्षित मनुष्य मिळावयाचा नाहीं. कां कीं, ह्या दोन्ही पुरुषांनीं स्वपराक्रमेंकरून, कांहीं वेळपर्यंत ही पृथ्वी दणाणून टाकिली होती. परंतु, शोध करून पाहिला तर असें समजतें कीं, युरोपांतल्या सांप्रत कालच्या भाषांत जार्ज वाशिंग्टन ह्याचीं जीं चरित्रें वेगळ्या वेगळ्या ग्रंथकारांनीं, वेगळ्या वेगळ्या प-

द्धतींनीं लिहिलीं आहेत, त्यांच्या दहावा हिस्सादेखील नेपोलियन बोनापार्टीचीं चरित्रें लिहिलेलीं नाहींत. ही तिऱ्हाईत ग्रंथकारांची गोष्ट क्षणभर एकीकडे असो. पण स्वतः नेपोलियन बोनापार्ट आपल्या तोंडानें एकदा असें ह्मणाला ह्मणून सांगतात कीं, "मीं जरी एवढी घडामोड केली आहे, तरी, राष्ट्रांच्या घडामोडींच्या गडबडींत माझें नांव कोठें नाहींसें होईल ह्याचा पत्ता देखील लागावयाचा नाहीं; पण, जार्ज वाशिंग्टन ह्याची कीर्ति, जोंपर्यंत इतिहासशास्त्र विद्यमान राहील, तोंपर्यंत ह्या जगांत गाजत राहील." हें ह्मणणें ह्या वेळापर्यंत खरें झालें आहे. सारांश सांगावयाचा एवढाच आहे कीं, सद्गुणांचें वर्णन हें सर्व प्रकारें हितकारक आहे; आणि त्यांत एक प्रकारचें अवर्णनीय सुख आहे. आणखी त्यांतही मित्राच्या गुणांचें वर्णन करावयाचें ह्मटलें ह्मणजे, तें विशेष श्रेयस्कर आणि विशेष आल्हादकारक वाटलेंच पाहिजे. हा एक हेतु, हें चरित्र हातीं घेण्यास कारणभूत झाला आहे.

दुसरा हेतु असा आहे कीं, जावजी शेट ह्यांच्या ठायीं जे अनेक सद्गुण होते, आणि ज्या सद्गुणांच्या योगानें ते थोरपणास चढून सर्वांच्या स्तुतीस पात्र झाले होते, त्या सद्गुणांचें वर्णन करून, एके प्रकारें लोकांच्या ऋणांतून मुक्त व्हावें. ह्मणजे, कांहीं तत्त्ववेत्त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, जगाच्या उपयोगीं पडण्यासारखें जें कांहीं आपल्या हातीं असेल, तें प्रगट करणें

किंवा लोकांस देणें हें मनुष्याचें अवश्य कर्तव्य आहे—किंबहुना तें एका प्रकारचें ऋण आहे—तें फेडिलें पाहिजे. आणखी विशेष परिचयाच्या योगानें जावजींचे पुष्कळ गुण मला ठाऊक झालेले आहेत. ते अनुकरणीय आहेत. त्यांचें वर्णन करणें हें माझें काम आहे. तें करवेल तितकें आपण करावें, अशी माझी इच्छा आहे.

आणखी तिसरा हेतु असा कीं, सध्या जी एक मोठी ओरड आमच्या लोकांत चालली आहे कीं, उद्योग करण्यास ठिकाण राहिलें नाहीं, जिकडे पाहावें तिकडे सगळ्या प्रकारच्या माणसांची गर्दी झालेली आहे, हें खरें नाहीं, खोटें आहे, हें थोडक्यांत दाखवावयाचें आहे. हें विशेषेंकरून सांगावयाचें कारण असें कीं, जावजींचें मत असें होतें. ह्मणजे, ते नेहमीं असें ह्मणत असत कीं, लोकांस उद्योगास जागा नाहीं असें नाहीं, जागा पाहिजे तितकी आहे; पण लोक झटून उद्योग करीत नाहींत, ह्मणून त्यांस द्रव्यलाभ होत नाहीं.

हे हेतु मनांत धरून हें अल्प चरित्र लिहिण्यास आरंभ केला आहे. हे हेतु अल्पस्वल्प तरी पूर्ण व्हावे, अशा रीतीनें हें चरित्र शेवटास जावें, अशी प्रार्थना परमेश्वरास मी करितों. ती तो सफल करो.



# भाग दुसरा.

## जन्म आणि बाळपण.

धन्य धन्य नरदेहो
येथील अपूर्वता पाहाहो
जो जो कीजे परमार्थलाहो
तो तो पावे सिद्धीतें.

रामदास.

वृक्ष चांगला मोठा झाला, आणि त्यास चांगलीं फळें येऊन तो लोकांच्या उपयोगीं पडूं लागला, ह्मणजे, तो मुळीं कसा वाढला असावा, आणि त्यास इतका चांगला होण्यास कोणतें साहित्य साधनभूत झालें असावें, हें समजण्याची इच्छा मनुष्यास साहजिक होते. पण, हरहमेषा असें घडतें कीं, कालांतरामुळें, आणि ती हकीकत कोणीं राखून ठेविली नसल्यामुळें, ती जिज्ञासा पूर्ण होत नाहीं; आणि ती तशीच मागें राहाते. हाच प्रकार जगांतल्या थोर पुरुषांच्या बालपणाच्या हकीकतींविषयीं दृष्टीस पडतो.

आपल्या देशांत मनुष्यांच्या हकीकती टिपून ठेवण्याची वहिवाट पहिल्यापासून नाहीं, ह्मणून आमच्यांतल्या मोठ्या माणसांच्या साद्यंत वृत्तांतांची गोष्ट क्षणभर एकीकडे असो; पण, इंग्लंडासारख्या विद्याचारसंपन्न देशांत मनुष्यांच्या जन्मादिकांची नोंद ठेवण्याचा परिपाठ पुष्कळ वर्षांपासून चालू असून, तेथेंही थोर माणसांच्या लहानपणच्या हकीकतींविषयीं ह्याच प्रकार आहे. इंग्लंडांतला कविशिरोमणि शेक्सपियर हा इलिझाबेथ राणीच्या वेळीं ह्मणजे सत्राव्या शतकांत होऊन गेला. जसा आपल्या प्राचीन कवींत कालिदास, तसा शेक्सपियर हा इंग्लंडांतल्या कवींत नामांकित आहे. पण त्याचें पूर्ववृत्त इतिहासांत कोठें आढळत नाहीं. ह्मणून त्याचे चरित्रकार, त्याच्या ग्रंथांतल्या शब्दरचनेवरून, त्याच्या लहानपणच्या व्यवसायाविषयीं तर्क बसवितात. एक ह्मणतो, त्याच्या ग्रंथांत नौकानयनांतले शब्द फार येतात, ह्यावरून तो लहानपणीं खलाशी असावा; दुसरा ह्मणतो कीं, त्याच्या लेखांत घोड्यांच्या गुणांचें वर्णन फार मार्मिक रीतीचें येतें, ह्यावरून तो घोड्यांच्या व्यापारांत पडलेला असावा; आणि कोणी असें सिद्ध करतात कीं, तो नाटककार मंडळींत रहात असावा. खरें कांहींच समजत नाहीं. ही त्याच्या बालपणाच्या हकीकतीची गोष्ट झाली. जन्मकालाची आणि जन्मस्थलाची गोष्ट तर ह्याहीपेक्षां अनिश्चित आहे. आणखी,

दुसऱ्या पुष्कळ थोर पुरुषांच्या जन्मवृत्ताचें आणि लहानपणाचें असेंच आहे. तेव्हां, आमच्या जावजी शेटच्या जन्मवृत्ताविषयीं आणि बालपणाविषयीं हकीकत संदिग्ध असावी, ती बरोबर मिळूं नये, ह्यांत कांहीं विशेष नाहीं. तरी, जी थोडीशी हकीकत आह्मांस मिळाली आहे, ती आह्मी येथें सादर करितों.

जावजी शेट ह्यांचे पणजे जावबा चौधरी ह्मणून होते. ते ठाणें जिल्ह्यांत शहापुर तालुक्यांत विडें येथें राहात असत. ते प्रथम निर्वाहाकरितां मुंबईस आले, आणि उमरखाडींत राहिले. त्यांच्या मुलाचें नांव पदाजी होतें. पदाजींचे चिरंजीव दादाजी हे होते; आणि दादाजींचे चिरंजीव हे जावजी होत. ह्यांचा जन्मकाल बरोबर कोठें समजत नाहीं. परंतु त्यांचें जन्म त्यांच्या उमरखाडींतल्या घरांत इ० स० १८३९ ह्या वर्षी झालें असावें, असा अजमास आहे. ते आपल्या लहानपणच्या गोष्टी प्रसंगवशात् सांगत असत. त्यांवरून असें वाटतें कीं, त्यांना जरी लहानपणीं एका शाळेंत घातलें होतें, तरी, त्यांचा सगळा वेळ उनाड मुलांच्या संगतींत जात असे. गांवांत मुलांबरोबर पाहिजे तिकडे हिंडावें, खावें प्यावें आणि टवाळ्या कराव्या, हा काय तो त्यांचा व्यवसाय असे. ते वारंवार आपल्या प्रकृतिमानावरून असें सांगत कीं, लहानपणीं हिरवे आंबे तिखटमीठ घालून भराभर खावे, आणि त्यावर पाहिजे तितकें पाणी प्यावें, तरी कांहींएक होत

नसे. आणि आतां एक पिकला आंबा खाल्ला तरी लागलाच बाधतो. आणखी, असे आंबे घेण्याकरितां एकदां एक कडें गाहाण ठेवल्याची गोष्टही ते सांगत असत. एकंदरींत, त्यांचें लहानपण उनाडक्यांत गेलें, आणि विद्याभ्यास कांहींएक झाला नाहीं, हें खरें आहे. त्यांस "जावजी दादाजी" एवढी सही करण्यापुरतें लिहितां येत होतें, आणि सरासरी मराठी वाचतां येत होतें.

येथें एक विचार सुचतो. तो असा कीं, लहानपणीं जावजींचा फारसा विद्याभ्यास झाला नाहीं, आणि त्यांची मानसिक शक्ति जशीच्यातशीच, न थकतां, सुरक्षित राहिली, ती शक्ति त्यांस पुढें, मुद्रणकलेची सुधारणा करण्याच्या कामांत उपयोगीं पडली. हेच, ते, त्यांच्या वयाच्या कांहीं मंडळीप्रमाणें, शाळांत आणि विश्वविद्यालयांत जाऊन आपली मानसिक शक्ति खरचून विद्या संपादिते, आणि पदव्या मिळविते, तर, त्या दिशेनें ते चांगल्या नांवारूपास, कदाचित् आले असते; परंतु, मुद्रणकलेची जी उत्कृष्ट सुधारणा त्यांनीं केली, ती करण्यास त्यांस मानसिक शक्ति कदाचित् राहिली नसती. ह्मणून आह्मी असें ह्मणतों कीं, लहानपणांत त्यांच्या मानसिक शक्तीचा खर्च शब्दपांडित्याकडे झाला नाहीं, हें त्यांचें स्वतःचें आणि आमच्या देशांतल्या मुद्रणकलेचें मोठें भाग्य आहे. ह्यांच्या वयाचे जे कितीएक पदवीधर

ग्रंथ वाचनालय, सातारा.

आमच्या ह्या प्रांतीं सध्या आहेत, त्यांतल्या एकाच्यानें देखील, संपत्तिसंपादनांत, सुशीलतेंत, आणि देशाच्या उपयोगीं पडण्यांत जावजी शेट ह्यांची बरोबरी करवणार नाहीं. ह्मणून जीं मुलें, शब्दपांडित्यांत मन आणि देह न झिजवितां, इकडे तिकडे हिंडून कालक्रमणा करीत आहेत, त्यांजकडे पाहून आमच्या देशहितेच्छूंस वाईट वाटण्याचें प्रयोजन नाहीं. त्या मुलांची मानसिक शक्ति क्षय न पावतां, पुढें दुसऱ्या कांहीं मोठ्या कार्याकरितां, जशीच्यातशी रहात आहे, असें त्यांनीं समजावें. पण, जावजींप्रमाणें, त्या शक्तीचा उपयोग पुढें चांगल्या कार्याकडे झाला पाहिजे. तीच मोठी अडचण आहे. असो.

आपल्या वयाच्या दहाव्या वर्षीं जावजींनीं अमेरिकन मिशन छापखान्यामध्यें टाईप घांसण्याची दोन रुपये दरमहाची चाकरी धरिली. हाच त्यांच्या उद्योगास आरंभ होय. हा आरंभ फार चांगला झाला, असें आह्मी ह्मणतों. कां कीं, ज्या उद्योगाकडे जावजींच्या मनाचा स्वाभाविक कल होता—जो उद्योग त्यांस पुढें उत्तम प्रकारें करतां येण्यासारखा होता—तोच त्यांचे हातीं लागला. असें होणें केवळ सुदैव होय. आणखी आह्मी असें ह्मणतों कीं, ज्यांचे हातून पुढें मोठीं कृत्यें व्हावयाचीं असतात—किंवा जे कोणी मोठ्या लौकिकास चढावयाचे असतात—त्यांसच असा योग आपोआप येतो; इतरांस येत नाहीं. आणि खरोखर माणसाचा

कल कोणत्या विषयाकडे आहे—कोणता विषय त्यास चांगला येईल—हें लहानपणीं बरोबर कळत नाहीं. त्यामुळें असें घडतें कीं, जीं माणसें मोठेपणीं कांहीं एका गुणाच्या योगानें मोठ्या नांवालौकिकास चढतात, तीं माणसें, लहानपणीं, अन्य व्यवसायांत घातलेलीं असतात तेव्हां अगदीं मूर्ख आणि अजागळ ठरतात. हिंदुस्थानांत इंग्लिश लोकांस राज्य मिळवून दिलें, तो लार्ड क्लैव्ह लहानपणीं अतिशयित वाईट विद्यार्थी होता. तो शाळेंत गेला आणि आपल्या गुरूशीं भांडून निघाला नाहीं, असें कधीं झालें नाहीं. पुस्तक ह्मणजे त्याला शत्रु वाटे. ह्मणजे त्याच्या मनाचा कल ज्ञानसंपादनास अनुकूल नव्हता; ह्मणून तो शाळेंत सर्वांस मूर्ख दिसला; आणि मद्रासेस जाऊन कांहीं करो—मरो—असें त्याच्या घरच्या माणसांस झालें. नेपोलियन बोनापार्ट आणि ड्यूक आफ् वेलिंग्टन ह्यांची गोष्ट अशीच आहे. बोनापार्टाविषयीं कोणीं असें लिहून ठेविलें आहे कीं, "तो धडाखडा मात्र होता. पण अभ्यासांत इतर मुलांसारखा सरासरी होता." ड्यूक आफ् वेलिंग्टनाची आई त्यास "गाढव" ह्मणत असे. रुधिराभिसरणाचा शोध लाविला, त्या हार्व्हेविषयींची हकीकत अशीच आहे. त्याचा शिक्षक डाक्टर काड्यू हा त्याविषयीं एकदा असें ह्मणाला कीं, "हार्व्हे हा माझ्या हाताखालीं होता, तेव्हां, ज्या गुणावरून तो पुढें

मोठ्या लौकिकास चढला, तो गुण मला मुळींच त्याचे ठायीं कधीं दिसला नाहीं.” शिवाजी महाराजांस जर लहानपणीं विद्या शिकायास लाविलें असतें, तर त्यांच्या गुरूंनीं त्यांस अगदीं निरुपयोगी विद्यार्थी ह्मटलें असतें. त्याप्रमाणें, जावजींस जर लहानपणीं, कोणाच्या अगत्यामुळें किंवा आग्रहामुळें सहा इयत्ता शिकत बसणें भाग पडलें असतें, तर तेथें कदाचित् त्यांची बुद्धि चालली नसती, त्यांचा वेळ आणि त्यांचे श्रम हे फुकट गेले असते, आणि त्यांच्या गुरूंनीं त्यांस अजागळ ह्मटलें असतें. पण, तसा प्रसंग आला नाहीं. ज्या व्यवसायांत त्यांच्या बुद्धीची गति उत्तम प्रकारें चालावयाची होती, तोच व्यवसाय कर्मधर्मसंयोगानें, प्रथमारंभीं त्यांचे हातीं लागला, हें त्यांचें सुदैव होय.

ह्यावरून आईबापांस आणि मुलांच्या पालनकर्त्यांस एक मोठा बोध घेण्यासारखा आहे. तो हा कीं, व्यवसायाविषयीं मुलांवर कधीं जुलूम करूं नये. आपल्या मुलानें अमका व्यवसाय केलाच पाहिजे, असा आग्रह धरून बसूं नये. मुलांस सामान्य प्रतीचें शिक्षण द्यावें, त्यांस बऱ्यावाईटाची समजूत करून द्यावी, आणि त्यांस दृढ निश्चयानें उद्योग करण्याची संवय लावावी, ह्मणजे बस्स आहे. व्यवसायाची निवड जी आहे, ती त्यांची त्यांजवर ठेवावी. मुलांस व्यवसाय करतां येण्यासारखा असावा एक, आणि आपण त्यांच्या ठायीं बळजब-

रीनें कोंबावा दुसरा. हें कसें होतें, तर, चौकोनी भोंक बंद करण्यास वाटोळी खुंटी मारावी, किंवा वाटोळें भोंक बंद करण्यास चौकोनी खुंटी मारावी, तसें होतें. अथवा, आवडत असावा पदार्थ एक, आणि घशांत कोंबावा दुसरा, असें होतें. त्याच्या योगानें फार अहित होतें. परंतु, जो पदार्थ आवडत असावा, तोच खायास मिळावा, हें मोठें भाग्य आहे. असें भाग्य जावजी शेट ह्यांचें होतें असें दिसतें. असो.

अमेरिकन मिशन छापखान्यांत दहा वर्षेपर्यंत चाकरी करून, जावजी, वाढतां वाढतां, दरमहां सात रुपयेपर्यंत मिळवूं लागले. पुढें तो छापखाना टैम्स आफ् इंडियानें विकत घेतला. त्यांत जावजींस दरमहां दहा रुपये मिळूं लागले. तेथें दीडवर्ष चाकरी केल्यावर, जावजी तेरा रुपये दरमहावर इंदुप्रकाशांत चाकरीस राहिले. पुढें तेथें त्यांस पंधरा रुपये दरमहां मिळूं लागले. तेथें दीडवर्ष काम केल्यावर त्यांस ओरिएंटल छापखान्यांत, तीस रुपये दरमहावर टैप पाडण्याचे कामावर नेमिलें. तेथें त्यांचे हातचे टैप सर्वांस आवडूं लागले. तेव्हां त्यांचे मनांत असें आलें कीं, अशा रीतीनें दुसऱ्याच्या ताब्यांत राहून टैप पाडण्यापेक्षां, आपण स्वतंत्रपणें टैप पाडिले असतां आपणांस चांगला फायदा होईल. हाच विचार त्यांच्या स्वतंत्र उद्योगाचा आरंभ होय. हा आरंभ फार चमत्कारिक रीतीनें झाला. त्याचें कथन पुढच्या भागांत करूं.



# भाग तिसरा.

## उद्योग.

उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः

एक संस्कृत कवि.

ऐका सदैवपणाचें लक्षण
रिकामा जाऊं नेदी क्षण.

रामदास.

उद्योग हा कल्पतरु आहे; उद्योग हें सगळ्या सुखाचें मूळ आहे; उद्योग हा जीवाचा जीव आहे; अशी जावजींची खातरी झाली. आणखी उद्योग ही कामधेनु आपले स्वाधीन करून घेतली असतां,—ह्मणजे आपण स्वतंत्र धंदा केला असतां,—आपले सगळे मनोरथ पूर्ण होतील, असें त्यांचे मनांत भरलें. आणि टैप तयार करण्याचें काम आपले घरीं आपण स्वतंत्रपणें करावें, अशी त्यांस मनस्वी इच्छा झाली. परंतु, चांगल्या कामाविषयींची

नुसती इच्छा माणसाच्या उपयोगीं पडत नाहीं. तिच्या सिद्धीस साहित्य लागतें. स्वतंत्रपणें टैप पाडण्याचें काम घरीं करण्याची इच्छा जावजींस झाली, पण, त्या कृत्यास जें भांडवल पाहिजे होतें, तें त्यांपाशीं नव्हतें. ही एक मोठी अडचण आली; ह्मणून, थोडेंसें भांडवल उसनें मागण्याकरितां जावजी शेट हे, आपले मामा रा० रा० अर्जुनजी लस्ते ह्यांजकडे गेले. त्यांनीं पैसे मिळवून देण्याविषयीं त्यांस अभिवचन दिलें. तेव्हां जावजींस मोठा आनंद झाला. पण तो फार वेळ टिकला नाहीं. दुसरे दिवशीं जावजींस मामांनीं सांगितलें कीं, "कांहीं तरी गाहाण ठेविल्याशिवाय पैसा मिळत नाहीं." तें ऐकून जावजींचें मन फार विरस झालें. त्यांस फार वाईट वाटलें. आणि ते, तोंड वाईट करून, आपल्या घराकडे परत यावयास निघाले. ही सगळी गोष्ट, मामांच्या घरीं कांहीं दुसऱ्या कामाकरितां एक मारवाडी आला होता, त्याच्या दृष्टीस पडली. त्यास जावजींच्या बोलण्यावरून आणि चालचर्येवरून एकदम असें वाटलें कीं, हा मनुष्य उद्योगी आणि सच्चा आहे, ह्यास पैसे दिले असतां कधीं बुडावयाचे नाहींत; व्याजमुद्दल सुद्धां परत येतील. तेव्हां, त्या मारवाडी शेटजींनीं जावजींस रस्त्यावर गांठून, त्यांची सगळी हकीकत विचारून घेऊन व्यापारास भांडवल देण्याविषयीं अभिवचन दिलें. त्याप्रमाणें त्यांनीं त्यांस सातशें रुपये दिले. आणि, तेवढ्या

भांडवलावर, जावजींनीं, इ० स० १८६४ ह्या वर्षी, कोलभाटवाडींत, ते राहात होते त्या घराशेजारीं, थोडीशी जागा भाड्यानें घेऊन, टैप तयार करण्याचा लहानसा कारखाना घातला.

ह्या ठिकाणीं एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं "सत्यसंकल्पाचा दाता नारायण। सर्व करी पूर्ण मनोरथ." मामांसारख्या आप्तांकडून भांडवलाची तजवीज होऊं नये, आणि, मारवाडी, ह्मणजे आंगचें पाप देखील दुसऱ्यास फुकट द्यावयाचे नाहींत, त्यांजकडून, कांहींएक तारण न घेतां, भांडवल मिळावें, हा एक खरोखर मोठा चमत्कार आहे. दैववादी ह्मणतील कीं, प्रारब्ध उघडावयाचा वेळ आला, ह्मणजे अशा गोष्टी आपोआप घडतात. हें ह्मणणें खरें किंवा खोटें ह्याचा वाद आह्मी करीत नाहीं. परंतु, ह्या वेळेस जावजींस जें काय उपयोगीं पडलें, तें त्यांचें सत्यशीलत्व होय. त्यांची सत्यशीलता त्यांच्या चर्येवर त्या मारवाडी शेटजींस स्पष्ट दिसून आली, ह्मणून त्यांस ती रक्कम देण्यास त्यांस धैर्य झालें, एरव्हीं झालें नसतें. ह्या मारवाडी शेटजींचें नांव **खुमाशेट** होतें. त्यांची रक्कम जावजी शेटजींनीं व्याजसुद्धां लवकरच फेडिली; आणि पुढें जेव्हां जेव्हां त्यांची गांठ पडे, तेव्हां तेव्हां ते त्यांचे उपकार मानण्यास आणि यथाशक्ति त्यांचा संतोष करण्यास मना-

पासून प्रयत्न करीत असत. शिवाय, इंदुप्रकाशांत चाकरीस असतां जावजींचा परिचय, मुंबईसमाचाराचे मालक शेट फिरोजशाहा मेहेरजी ह्यांशीं झाला होता, त्यांनींही जावजींस पैशाची मदत ह्या प्रसंगीं बरीच केली. त्यांचे उपकार ते नेहमीं आठवीत असत. ह्या एवढ्याशा गोष्टीवरून तात्पर्य एवढेंच शिकावयाचें कीं, अंतःकरण शुद्ध असावें, आणि उद्योगावर निष्ठा असावी, ह्मणजे कार्यसिद्धीस परमेश्वर साह्य करितो.

ह्या टैप पाडण्याच्या कामास जावजींनीं आरंभ कसा केला, तें थोडेंसें सांगितलें पाहिजे. टामस ग्राहाम आणि जीवन वल्लभ लोहार ह्यांपासून त्यांनीं मराठी आणि गुजराथी टैप ओतण्याच्या मेट्रिसी ठोकून घेऊन, त्यांवर टैप पाडण्याचें काम चालू केलें. त्या वेळेपासून रा० रा० राणू रावजी आरू हे गृहस्थ त्यांचे जवळ टैप पाडण्याच्या कामावर नौकरीस राहिले. त्यांस जावजी शेट ह्यांनीं पंच करण्यास शिकविलें, आणि त्यांचे हातून अक्षरांचे पंच करून घेण्याचा क्रम चालविला. तो आजपर्यंत अविच्छिन्न चालला आहे. राणू रावजी हे त्या कामांत चांगले प्रवीण झाले आहेत. आणि ते जावजी शेटच्या कारखान्यांत मनापासून फार सुंदर काम करीत आहेत. आणखी, जावजी शेट ह्यांच्या टैपांच्या सुंदरपणाचा जो एवढा मोठा लौकिक झाला आहे, त्यास वांटेकरी राणू रावजी हे

आहेत. ही गोष्ट जावजी शेट उघडपणें वारंवार कबूल करीत असत.

इ० स० १८६९ ह्या वर्षी जावजींनीं एक लहानसा छापखाना घातला, पण तो थोड्याच दिवसांनीं रा० रा० कमळोजी गौरोजी ह्यांस विकला. ह्यानंतर एक गोष्ट अशी झाली कीं, तिच्या योगानें जावजी शेट एका मोठ्या छापखान्याचे कायमचे मालक झाले. ती गोष्ट अशीः—त्या वेळेपर्यंत वे० शा० सं० रा० रा० विठ्ठल सखाराम अग्निहोत्री हे पंचांग शिळेवर छापीत असत. ते जावजी शेटजींस ह्मणाले कीं, "तुह्मी द्वादशपत्री सांच्यामध्यें टैपाचें पंचांग छापून प्रसिद्ध कराल, तर मी तुह्मांस पांचशें रुपये बक्षीस देईन." त्यावरून त्यांनीं पंचांगाचे टैप तयार करून, पंचांगाचें एक पृष्ठ दुसऱ्या छापखान्यांत छापून घेतलें, आणि तें अग्निहोत्रीबावांस दाखविलें. तें पाहून त्यांस फार संतोष झाला, आणि त्याच्या योगानें जावजी शेट ह्यांस काम करण्याची मोठी उमेद आली. त्यांनीं लागलाच एक लहानसा छापखाना तें पंचांग छापण्याकरितां विकत घेतला, आणि त्यास **निर्णयसागर** असें नांव ठेविलें. ह्या गोष्टी इ० स० १८६९ ह्या वर्षी झाल्या.

ह्या वेळेच्या सुमारास रा० रा० रामचंद्र अमृत मोरे हे जावजी शेट ह्यांस साथीदार मिळाले. हे गृहस्थ फार प्रामा-

णिक असून, छापखान्याचा कारखाना चालविण्याच्या कामांत फार कुशल आहेत. हे जावजी शेट ह्यांचे ज्ञातिबंधु आहेत. ह्यांजवर जावजी शेट ह्यांचा पूर्ण विश्वास असे. "रामचंद्रासारखा प्रामाणिक माणूस मिळावयाचा नाहीं," असें ते वारंवार ह्मणत असत, आणि प्रसंगीं आपली मोलवान ठेवरेव, न मोजितां, ह्यांच्या स्वाधीन करीत असत. आणखी, खरोखर, निर्णयसागराच्या एवढ्या मोठ्या लौकिकास रामचंद्र अमृत ह्यांचे गुण पुष्कळ उपयोगीं पडले आहेत. हे गृहस्थ आतां अशक्त झाले आहेत. तरी, ते, जावजी शेटजींच्या चिरंजीवांस कारखाना चालविण्याच्या कामीं, पूर्वींप्रमाणेंच साह्य करतात.

टैप तयार करण्यास आरंभ केल्यावर जावजींनीं टैप करण्याचें एक यंत्र आणि इंग्रजी फौंटाच्या दोन जातींच्या मेट्रिसीस हें सामान विलायतेहून आणविलें. आणखी पहिली जागा कॉमास पुरेना ह्मणून ग्रांटरोड रस्त्यावर एक मोठी जागा भाड्यानें घेतली. तेथें त्यांच्या कामाचा पसारा बराच वाढला. आणि त्या वेळापासून त्यांची इच्छा अशी असे कीं, टैप पाडण्यास जीं काय यंत्रें वगैरे लागतात, तीं सगळीं आपणांस येथल्यायेथें करतां यावीं. त्याप्रमाणें त्यांनीं कांहीं थोडा उद्योगही केला होता, आणखी त्याच्या योगानें कोणाकोणा कारागीर गृहस्थांस असा देखील संशय आला होता कीं, दुसऱ्या

कारागिरांनीं काढिलेल्या आणि पेटंट केलेल्या युक्तींस जावजींनीं हात घातला कीं काय. पण, मग तें तसेंच राहिलें. तथापि, आलीकडे यंत्रांची सगळी मोडतोड जावजी शेट आपल्या छापखान्यांत उत्तम प्रकारें नीट करीत असत. त्याचप्रमाणें मराठींतल्या अक्षरांच्या काना, मात्रा, वेलांटी इत्यादिकांच्या संबंधाची सुधारणा करून, ते टैप जुळण्यास फार खटपट पडते ती टाळतां यावी ह्मणून अखंड टैप तयार करण्याची त्यांनीं कल्पना काढली व त्याप्रमाणें बरेच टैप तयार करून त्यांनीं प्रचारांतही आणिले आहेत.

यंत्ररचनेच्या कामाचीं पुस्तकें त्यांस विलायतेहून वारंवार नजर येत असत. त्यांचा उपयोग त्यांस करतां येईना, ह्मणून त्यांस पराकाष्ठेची हळहळ वाटत असे. तरी, चित्रांच्या धोरणानें ते त्यांतल्या विषयांची माहिती होईल तितकी करून घेत असत. मला इंग्रजी येत असतें, तर विलायतेस जाऊन, हीं सगळीं यंत्रें कशीं करतात तीं पाहून, तशी खटपट आपण येथें करून पाहिली असती, असें त्यांनीं वारंवार ह्मणावें. आणखी, आह्मी खचीत सांगतों कीं, ते जर एकदा विलायतेस जाऊन तिकडचे कारखाने पाहून येते, तर, त्यांनीं आपल्या येथल्या कारखान्यांत पुष्कळ सुधारणा केली असती. परंतु, तसा योग आला नाहीं, हें आमच्या देशांतल्या मुद्रणकलेचें आणि ह्या राष्ट्राचें मोठें दुर्भाग्य होय.

तरी, त्यांनीं जी काय सुधारणा टैपांत आणि छापण्यांत केली आहे, ती चांगली वर्णनीय झाली आहे. ह्याचें मोठें प्रमाण हें आहे कीं, त्यांच्या छापखान्यांतले छापण्याचे दर, इतर छापखान्यांच्या दरांच्या मानानें जरा जास्ती आहेत, तरी, ह्यांजकडे कामाची झड पडत आहे. पुस्तक सुंदर छापावयाचें तें निर्णयसागरांतच छापलें पाहिजे, असा ग्रह सर्वत्र झालेला आहे. इतर साधारण लोकांची गोष्ट असो; पण छापखान्याच्या कामांत ज्यांची दृष्टि फार मर्मज्ञ झाली आहे, त्या इंग्लिश लोकांस देखील जावजींचे टैप फार पसंत वाटत आहेत. संस्कृत प्राचीन ग्रंथांच्या पुनरुज्जीवनाविषयीं, संस्कृतभाषाभिज्ञ कर्नल जी. ए. जेकब ह्यांनीं, विलायतच्या 'आकाडेमी' नामक सप्ताहिक इंग्रजी शास्त्रविषयक पत्रांत एक निबंध गेल्या एप्रिल महिन्यांत छापिला आहे. त्यांत जावजी शेट ह्यांविषयीं असें लिहिलें आहे कीं, "मुंबईतले निर्णयसागर छापखान्याचे मालक, रा० रा० जावजी दादाजी ह्यांनीं जीं संस्कृत पुस्तकें छापून प्रसिद्ध केलीं आहेत, तीं पाहाण्यासारखीं आहेत. ह्या गृहस्थांनीं संस्कृत ग्रंथ छापण्याकरितां टैप जितके उत्तम केले आहेत, तितके उत्तम टैप आजपर्यंत कधीं कोणीं केले नव्हते. आणखी ह्यांच्या टैपांइतके सुरेख टैप सगळ्या दुनयेंत दुसरे कोठें नाहींत. जयपुरदरबारांतले पंडित दुर्गाप्रसाद, आणि

मुंबईतले दुसरे कोणीएक पंडित[1] हे, 'काव्यमाला' नामक मासिकपुस्तक चालवितात, तें जावजी शेट छापतात. त्यांत अलंकारशास्त्रादि अनेक विषयांवर चांगले चांगले ग्रंथ येत असतात." इत्यादि.

येथें एक गोष्ट विशेष लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, छापखान्याच्या संबंधानें—ह्मणजे टैप पाडण्यापासून तों पुस्तकें बांधण्यापर्यंत—जीं अनेक प्रकारचीं कामें व्हावीं लागतात, त्या सर्वांत ह्यांची नजर उत्तम प्रकारें बसलेली होती. त्यांच्या कारखान्यांत, पांच सात खातीं मिळून, एकंदर चारशें माणसें कामावर आहेत. त्यांतल्या कोणास कांहीं अडचण आली कीं, त्यानें जावजींकडे यावें, आणि त्याची अडचण दूर करण्याची युक्ति जावजींनीं सांगावी, असें नेहमीं चालत असे. ह्मणजे, कारखान्यांत अमकें एक कांहीं बिघडलें आहे, तें कसें तें समजत नाहीं, तें पाहाण्यास दुसऱ्या कोणास बोलवा, असें ह्मणण्याचा प्रसंग त्यांस कधीं आला नाहीं. ह्यांतलें तात्पर्य असें कीं, छापखान्याच्या संबंधाच्या सर्व कामांत ते उत्तम प्रकारें प्रवीण होते. असे छापखान्याचे मालक फार थोडे असतात.

जावजी शेट जबरदस्त उद्योगी असत. ते कधीं रिकामे बसत नसत. पाहावें तेव्हां ते कोणत्या ना कोणत्या कामांत

१ रा० रा० काशिनाथ पांडुरंग परब.

गुंतलेले असत. त्यांच्या हातांत कागद किंवा टैप नाहीं, किंवा त्यांचें बोलणें कोणाशीं चाललेलें नाहीं, असे ते कधीं आढळले नाहींत. त्यांस उद्योग हें मोठें भूषण वाटत असे. कधीं कधीं पाहावें तों त्यांचे हात, टैप पाहातां पाहातां अगदीं मळीन झालेले असावे. आपण आतां एवढ्या मोठ्या कारखान्याचे मालक झालों, आतां असें हात मळण्याचें काम आपण कशास करावें, हें कधीं त्यांच्या मनाला शिवलेंच नाहीं. निष्पाप उद्योग कोणत्याही प्रकारचा असो, त्याची योग्यता फार मोठी आहे, असें आलफ्रेड धि ग्रेट ह्यास वाटे, तसें जावजी शेट ह्यांस वाटत असे. सर वाल्टर स्काट ह्यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, "जी विद्या मनुष्य आपण होऊन शिकतो, तीच त्याला उत्तम येते." हें तत्त्व जावजींस फार चांगलें समजलें होतें, आणि, त्यांस जें काय चांगलें असें वाटत असे, तें स्वतः शिकण्याविषयीं ते निरंतर प्रयत्न करीत असत. आणखी, त्यांस शिकायाच्या गोष्टी पुष्कळ दिसल्या होत्या. ह्यामुळें ते नेहमीं कोणती ना कोणती तरी नवीन योजना करण्यांत गुंतलेले असत. ज्या मनुष्यास पुष्कळ कामें करावयाचीं असतात, त्यास वेळ थोडा व्हावा, आणि तो नेहमीं उद्योगांत गढलेला असावा, हें साहजिकच आहे.



# भाग चौथा.

## औदार्य.

दानं च दापनमथो मधुरा च वाणी
त्रीण्यप्यमूनि खलु सत्पुरुषे वसंति.

भर्तृहरि.

जावजींमध्यें औदार्य हा गुण फार मोठा होता. त्याचा पुरता विकास झाला नव्हता; त्यामुळें त्याचीं फळें त्यांच्या कृतींमध्यें लोकांत फारशीं दृश्यमान झालीं नाहींत. परंतु, त्या गुणाच्या संबंधानें एक दोन गोष्टी घडल्या आहेत; त्या सांगितल्या असतां आमच्या ह्मणण्याची सत्यता सहज लक्षांत येण्यासारखी आहे.

त्यांच्या कारखान्यामध्यें चौदा पंधरा रुपये दरमहाचा एक कंपाझिटर होता. तो आजारी पडून कोंकणांत आपले गांवीं गेला, आणि तिकडेसच मरण पावला. त्याचा कांहीं दिवसांचा पगार कारखान्याकडे राहिला होता. तो मागावयास

त्याचा म्हातारा—साठपांसष्ट वर्षांचा—बाप छापखान्यांत आला. त्यास तो राहिलेला पगार देण्याविषयींची परवानगी कारकुनानें जावजींस विचारिली. तेव्हां त्यांजपाशीं मी बसलों होतों. जावजींनीं त्यास तो राहिलेला पगार देण्यास सांगून, शिवाय आणखी एका महिन्याचा पगार बक्षीस देण्यास सांगितलें! त्याप्रमाणें त्या वृद्ध पित्यास ते पैसे दिले, तेव्हां त्याला असें रडें कोसळलें कीं तें सांगतां येत नाहीं. तें रडें मुलाची आठवण होऊन तर कोसळलें खरेंच; पण, आपला मुलगा अशा थोर आणि दयाळू यजमानाच्या सेवेस अंतरला, हें त्याच्या मनांत उभें राहून त्याला अतिशयित वाईट वाटलें! वास्तविक पाहिलें असतां, त्यास आणखी एका महिन्याचा पगार बक्षीस देण्याचें कांहीं प्रयोजन होतें काय? मृत मनुष्यावर उपकार करून काय करावयाचें होतें? पण, नाहीं. जावजींचें पाहाणें फलाकडे नव्हतें; तर, कृत्याच्या चांगलेपणाकडे होतें. त्याचें हें फल होय. ह्यालाच खरें पुण्यकर्म ह्मणावयाचें.

दुसरी गोष्ट. सध्या मुंबईमध्यें **"महाराष्ट्रवक्तृत्वोत्तेजक मंडळी"** ह्मणून एक सभा आहे. तिचे उत्पादक जावजी शेट होत. त्या प्रकरणाची हकीकतही चमत्कारिक आहे. जावजींपाशीं अनेक प्रकारच्या गोष्टी चालत असत, त्यांत मी त्यांस प्रसंगवशात् असें ह्मणें कीं, "वक्तृत्वसभा न-

[library stamp]



गरनासिकासारख्या लहान लहान शहरीं चालाव्या, आणि तशी सभा मुंबईस नसावी, ही गोष्ट फार शोचनीय आहे." परंतु, वक्तृत्वसभा ह्मणजे काय, आणि तिचें काम काय, हें त्यांस ठाऊक नसल्यामुळें त्याविषयीं त्यांस फारसें बोलतां येईना. तथापि त्यांस असें वाटे कीं, हे इतक्या अगत्यानें ज्यापक्षीं बोलतात, त्यापक्षीं हें कृत्य विशेष उपयोगी असलें पाहिजे. असें होतां होतां एके दिवशीं, ते मला ह्मणाले कीं, "तुह्मी काय वक्तृत्वोत्तेजक सभा ह्मणतां, ती करायास काय खर्च लागेल बरें?" मीं सांगितलें कीं, "मुंबईसारख्या शहरांत, त्या समारंभामध्यें बक्षीस देण्यास सुमारें दीडशें रुपये, आणि इतर खर्चास दीडशें रुपये, असे एकंदर सुमारें तीनशें रुपये लागतील." तें ऐकून घेऊन, थोडा वेळ विचार करून, ते मला ह्मणाले, "बरें आहे; तीनशें रुपये घेऊन जा, आणि काय ती सभा एकदा होऊं द्या. पाहूं काय गंमत होते ती." तें ऐकून मला शेटजींच्या औदार्याचें मोठें आश्चर्य वाटलें. आणि, त्या कामाचा विचार आह्मी करूं लागलों. आणखी, हातांत एक पैही नसतां, आणि वर्गणी कोणापाशीं मागितली नसतां, इ० स० १८८६ च्या आक्टोबर महिन्याच्या ११ व्या तारखेच्या इंदुप्रकाशांत, १४९ रुपये बक्षिसाची जाहिरात दिली. तिच्याखालीं सह्या, माझे मित्र रा० रा० काशिनाथ त्रिंबक खरे आणि रा० रा० नारायण नरसिंह साठे

ह्यांच्या आहेत. हा ह्या सभेस आरंभ होय. ह्या सत्कृत्यास तीनशें रुपये देण्याविषयीं जावजी शेटनीं अभिवचन दिल्यावरून ही जाहिरात दिली खरी; परंतु, सगळ्या रकमेचा भार त्यांजवर टाकणें हें बरें नाहीं, असें पूर्वोक्त दोघां चिटणिसांस वाटलें, आणि, त्यांनीं वर्गणी जमविण्याची मोठी खटपट केली, वर्गणीची बरीच रकम मिळविली, आणि शेटजींपासून फक्त पंचवीस रुपये वर्गणी घेऊन, तें कार्य सिद्धीस नेलें. हा क्रम आज सहा वर्षें अव्याहत चालला आहे. ह्याबद्दल मित्र खरे आणि मित्र साठे ह्यांची स्तुति केल्यावांचून आणि त्यांचे आभार मानल्यावांचून माझ्यानें राहाववत नाहीं. आतां, ह्या सभेसारख्या सभांत जे वक्ते तयार होतात, ते देशाच्या कल्याणाच्या उपयोगीं पडतील कीं नाहींत, हा एक मोठा वाद आहे. त्यांत आह्मांस आज पडावयाचें नाहीं; तरी, एवढें कबूल केलें पाहिजे कीं, आपल्या आंगची वक्तृत्व-शक्ति प्रगट करण्यास आमच्या तरुण मंडळीस ह्या सभांमध्यें उत्तम संधि सांपडते, त्यांच्या तोंडून अनेक प्रकारच्या विषयांचें विवेचन होऊन, तें शेंकडों तरुणांच्या कानीं पडतें, त्याच्या योगानें त्यांच्या अंतःकरणांत नवीन विचारांचें बीजारोपण होतें, आणखी, कांहीं वेळपर्यंत तरी, घरोघर त्या विचारांचा ऊहा-पोह चालतो, हें कांहीं थोडें नव्हे. असो. जावजी शेटच्या उदार बुद्धीच्या योगानें ही मुंबईची सभा चालू झाली आहे,

हा त्यांचा खरोखर मोठा उपकार आहे. ह्या सगळ्या गोष्टीं-तलें तात्पर्य एवढेंच घ्यावयाचें कीं, वक्तृत्वसभा हें कांहीं तरी चांगलें कृत्य आहे, तें एकदां तरी करून पाहावें, एवढ्या विचारावर ते पदरचे तीनशें रुपये खरचिण्यास तयार झाले. ही गोष्ट कांहीं सामान्य नव्हे. आह्मांला असें वाटतें कीं, कोलंबसास साह्य करण्यास फेर्दिनांद राजा आणि इसा-बेला राणी हीं तयार झालीं होतीं, त्याहीपेक्षां हें जावजी शेटचें औदार्य विशेष वर्णनीय आहे. कां कीं, त्या राजाराणीनें जो आश्रय त्यास दिला होता, त्यांत त्यांस अशी आशा होती कीं, तो नवीन देश शोधून काढील, त्याचें स्वामित्व आपणांस मिळेल. तसा कांहीं प्रकार प्रकृत प्रकरणांत नव्हता. असो.

तिसरी गोष्ट. जावजी शेटनीं "बालबोध" ह्या नांवाचें एक लहानसें मासिक पुस्तक आज अकरा वर्षें चालू ठेविलें आहे. तें चांगलें चाललें आहे. त्याचा प्रवेश राजमंदिरां-पासून झोंपड्यांपर्यंत आहे. त्यास वर्गणीदार राजेरजवाडे आहेत; तसे, ज्यांस वर्गणी देण्यास सामर्थ्य नाहीं, असेही आहेत. हें मासिक पुस्तक श्रीमंत सयाजीराव महाराज गाय-कवाड अगदीं आरंभापासून घेत असतात. त्यांस ह्या पुस्त-काची योजना फार आवडली, आणि त्यांनीं बालबोधास एक हजार रुपये बक्षीस दिले. त्या संबंधानें जें पत्र जावजी शेट ह्यांस आलें, तें असें आहे:—

श्री.

राजमान्य राजश्री बालबोध पुस्तकाचे म्यानेजर, मुक्काम मुंबई, यांसी, सलाम दिगर. आपले बालबोध पुस्तकासंबंधानें श्रीमंत महाराज साहेब यांचे उद्गार निघाले तेः–

"बालबोध पुस्तकाची भाषा सरळ असून त्यांतील शब्दरचना विचारपूर्वक केलेली असते. मुलांस जसें पुस्तक असावें तसें हें उपयुक्त आहे. ह्या कामीं ग्रंथकर्त्यांनीं केलेला आरंभ व प्रयत्न स्तुत्य आहे. अशीं पुस्तकें आपले मुलांबाळांसमोर जितकीं येतील तितकीं आपले देशास फायदेशीर आहेत."

सदर कामाबद्दल आपणांस एक हजार रुपये बाबाशाई देण्याविषयीं हुजूरची आज्ञा जाहली आहे. ही रकम आपण बडोद्याहून खानगी कारभारी यांजकडोन मिळण्याबद्दल मागणी केली असतां मिळेल.

तारीख २५ माहे डिसेंबर सन १८८८. मुक्काम पंचगणी.

पेस्तनजी दोराबजी.

हें पत्र हातीं आल्यावर वाचून तें जावजी शेट ह्यांनीं बालबोधकारांकडे पाठविलें. आणि त्यानंतर त्यांची माझी जेव्हां प्रथम गांठ पडली, तेव्हां त्यांस परम संतोष झाला. आणि त्यांचे तोंडांतून असे शब्द निघाले कीं, "बालबोधानें मिळविला, असा मान काव्यमालेचा झाला पाहिजे."

पुढें ह्या पत्राप्रमाणें मागणी केल्यावर ही रकम गायकवाड सरकाराकडून आली. पण, जावजी शेटनीं तिला हात देखील लाविला नाहीं; आणि ती जशीचीतशी बालबोध-

कारांकडे पाठवून दिली. ह्या संबंधानें पुण्याच्या **ज्ञानचक्षु**-कारांनीं जें लिहिलें आहे, त्यांत पुष्कळ सत्य आहे. तो लेख असा आहेः—

"शेट जावजी दादाजी यांचेकडे श्री० गायकवाड सरकारांकडून, निर्णयसागर छापखान्यांतून जें **बालबोध** नामक मासिक पुस्तक प्रसिद्ध होत असतें, त्याच्या चांगुलपणाला पारितोषिक ह्मणून १००० रुपये आले. **बालबोधा**च्या चांगुलपणांत त्याची भाषा, विषयरचना वगैरेंची तारीफ गायकवाड सरकारांनीं केली होती. **बालबोध** हें मासिक पुस्तक जावजी शेटजींच्या मालकीचें असून त्यांत चित्रें वगैरे घालण्याचा विशेष खर्च ते करतात, तो वेगळाच. परंतु ह्या प्रमाणें हें जें गायकवाड सरकारांकडून **बालबोधा**ला पारितोषिक आलें, तें जावजींनीं तसेंच्यातसेंच **बालबोधा**च्या कर्त्यांकडे पाठविलें. **बालबोधा**च्या कर्त्यांस त्यांच्या कर्तृत्वाबद्दल जावजी शेटजींकडून नियमित मुशाहिरा मिळत असतोच; तेव्हां त्या कर्त्यांनींही तें बक्षीस आपल्या हक्काचें नसून **बालबोधा**चे मालकाच्या हक्काचें आहे, असें समजून, त्यांनीं तें पारितोषिक पुनः परत जावजींकडे पाठविलें. मग जावजींनीं **बालबोधा**च्या कर्त्यांस असा खुलासा कळविला कीं, हे हजार रुपये श्रीमंत गायकवाड सरकारांकडून जे आले आहेत ते, **बालबोध** पुस्तकाच्या चांगल्या छपाईबद्दल, नीटनेटकेपणाबद्दल आणि त्यांतील कागद, शाई वगैरे उपगुणांबद्दल पारितोषिक ह्मणून जर आले असते, तर मीं तुह्मांला यांतील एक पैही दिली नसती. परंतु हें जें पारितोषिक आलें आहे, तें त्यांतील विषयरचना, भाषासौष्ठव आदिकरून गुणांच्या अभिनंदनार्थ ह्मणून आलें असल्यामुळें, त्यांतील एक पैही, मी त्या पुस्तकाचा मालक ह्मणून, मी घेणार नाहीं.

प्र. ५१ २३-८-५१



आणि असें ह्मणून, त्या सहस्रमुद्रा शेट जावजी यांनीं पुनः बालबोधकर्त्यांकडे परत पाठविल्या. व जावजी शेटजींच्या उत्तरानें बालबोधकार निरुत्तर होऊन त्यांनीं त्या पारितोषिकाचा नाइलाजानें स्वीकार केला. पुढें बालबोधकर्त्यांनींही त्या परितोषिकांतील ३०० रुपये बालबोध मासिक पुस्तकाचे मालकाच्या कारखान्यांतील लोकांस मिठाई, कपडे, वगैरे वांटण्याकडे देऊन ७०० रुपये मात्र आपण ठेविले. ह्याप्रमाणें बालबोध मासिक पुस्तकाचे कर्त्यांच्या व मालकांच्या मध्यें कोणाची निःस्पृहता अधिक जोरकस आहे हें पाहण्यासाठीं, जणूं काय, एक दिवस त्यांची शर्यतच लागली होती, असें ह्मटलें असतां चालेल! सारांश, शेट जावजींची निःस्पृहता व उदारता ह्यापेक्षां ती आणखी कोणत्या कसोटीवर लागली पाहिजे होती? अशा प्रकारचें औदार्य व निःस्पृहता आपल्याला विरळाच दृष्टीस पडेल!"

मृत मनुष्याचे शेवटचे संस्कार यथास्थित व्हावे, अशी त्यांची फार इच्छा असे. ती केवळ स्वजातीयांविषयींच असे असें नाहीं, परजातीयांविषयींही असे. जातींतलें कोणी मेलेंसें कळलें ह्मणजे—मग तें गरीब असो कीं श्रीमंत असो—जावजी शेटनीं, हातचीं कामें एकीकडे ठेवून त्याच्या मौतीस जावें, आणि तेथें जें काय उणें पडेल तें पूर्ण करावें, असा त्यांचा परिपाठ असे. त्यांचे कारकून विष्णुपंत गोखले, हे, रात्रीं मरण पावले. तेव्हां पाऊस मनस्वी पडत होता; आणि त्यांचे कोणी आप्त जवळ नसल्यामुळें त्यांस नेण्यासवरण्याची मोठी अडचण पडली होती. परंतु, जावजी शेटजींनीं स्वतः

त्यांच्या प्रेताबरोबर जाऊन, पदरचा पैसा खर्चून, ब्राह्मण मंडळीकडून त्यांचें सगळें यथासांग करविलें.

आपल्या ओळखीचा कोणी माणूस दुखणाईत झाला असें जावजींस कळतांच, त्यांनीं त्याजकडे जावें, त्याचा समाचार घ्यावा, त्यास औषधपाण्याची तजवीज सांगावी, आणि तो गरीब असल्यास त्यास पैशाचें साह्य करावें, अशी त्यांची रीति असे. तिच्या योगानें गरीब कुटुंबांस संकटसमयीं त्यांचा मोठा आधार असे. आणि तीं नेहमीं त्यांस दुवा देत असत.

एके प्रसंगीं त्यांच्या चिटणिसानें एक पुस्तक छापण्याचा अंदाज सरकारांत दिला, त्यांत नजरचुकीनें बेरीज करण्यांत दोन हजार रुपये कमी लागले. ती चूक मग कळली. पण तिच्या संबंधानें ते आपल्या चिटणिसास ब्र बोलले नाहींत. त्या अंदाजाप्रमाणें पुस्तकें छापून दिलीं, आणि तें नुकसान निमूटपणें सोशिलें. त्याविषयीं गोष्ट निघाली तेव्हां ते एवढेंच ह्मणाले कीं, "ती चूक माझे स्वतःचे हातून झाली असती तर मीं काय केलें असतें?" सामान्य गोष्ट नव्हे.

आलीकडे मुंबईमध्यें "प्रिंटर्स आणि पब्लिशर्स असोसिएशन" ह्मणून एक सभा स्थापित झाली आहे, ती पुस्तकें छापणाऱ्यांस आणि विकणाऱ्यांस, प्रसंगीं, सरकारदरबारामध्यें, फार उपयोगीं पडते. बीभत्स पुस्तकांवरून खटले करण्याचा विचार कांहीं दिवसांमागें निघाला होता, तेव्हां त्या सभेनें

बरीच बाजू थावटली. हिचें सगळें काम जावजी शेट ह्यांच्यां सल्ल्यानें चालत असे. हिच्या सभा जावजींच्या कारखान्यांत भरत असत. आणि हिच्या संबंधाची घस सोसण्यास ते नेहमीं मोठ्या आनंदानें तयार असत. आपल्या व्यवसायबंधूंस साह्य करणें—आणि त्यांचें हित तें आपलें हित मानणें—ह्यास चांगलें औदार्य लागतें. तें जावजी शेट ह्यांचेठायीं होतें. त्याच्या योगानें त्यांच्या व्यवसायबंधूंत त्यांस मोठा मान असे.

ह्याशिवाय आणखीही त्यांच्या उदारपणाच्या पुष्कळ गोष्टी आहेत. परंतु, त्यांविषयीं पाल्हाळ करण्याची आवश्यकता दिसत नाहीं. त्यांचा उदारपणा नुकतासा उदयास येऊं लागला होता, इतक्यांत त्यांस मृत्यूनें गांठिलें, त्यास उपाय नाहीं. आह्मी स्वतःच्या अनुभवावरून खचीत असें ह्मणतों कीं, संपत्तीचा उपयोग जावजी शेट ह्यांस उत्तम प्रकारें कळत होता. आणखी ते जर दहावीस वर्षें जगते, तर त्यांचें औदार्य परिपक्व होऊन, त्यांचें नांव युनिव्हर्सिटीच्या आश्रयदात्यांत येऊन, गरीबगुरिबांस त्याचा फार उपयोग झाला असता. परंतु, त्यांच्या अकालिक मृत्यूनें सगळया गोष्टी जागचेजागीं राहिल्या. तरी, अल्प काळांत त्यांनीं जें औदार्य प्रगट केलें, तें खरोखर अनुकरणीय आहे.



# भाग पांचवा.

## विचार आणि आचार.

ज्याचें अंतःकरण शुद्ध
तया करणें नलगे बोध.

तुकाराम.

भाग्याला सुजनत्व भूषण असे कीं मौन शौर्यास तें
ज्ञानाला शम त्या श्रुतास विनय द्रव्यास दातृत्व तें
अक्रोधत्व तपा क्षमा प्रभुपणा धर्मास निर्दंभता
या सर्वांसहि मुख्य भूषण पहा सच्छील हें तत्त्वता.

वामन.

आवर्जींच्या मनास विद्येचा संस्कार मुळींच झालेला नव्हता. तरी, चमत्कार असा होता कीं, पाश्चिमात्य महाविद्येचा संस्कार मनास होऊन, धर्माच्या संबंधानें मनुष्याची जी वृत्ति स्वाभाविकपणें होते, ती वृत्ति त्यांस प्राप्त झाली होती. ते धर्मसंबंधी विषयांवर बोलत असत, त्यावरून असें स्पष्ट दिसून येई कीं, सगळ्या धर्मांची

योग्यता त्यांस सारखी वाटत असे. मनुष्य आपल्या धर्मांप्रमाणें वागत असला, ह्मणजे तो चांगला, असा त्यांचा समज असे, आणि ते स्वतः आपल्या धर्माप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करीत असत. आणखी धर्मसंबंधानें कोणीं कोणाचें मन दुखवूं नये,—आणि धर्मसंबंधानें मन दुखविणें हें मोठें पाप आहे—असें ते समजत असत. त्यांचा संबंध बरेच दिवस अमेरिकन मिशन छापखान्याशीं होता. त्यामुळें, कितीएक अमेरिकन मिशनरी आणि कितीएक एतद्देशीय ख्रिस्ती लोक ह्यांचा परिचय त्यांच्याशीं झाला होता. त्यांविषयीं ते वारंवार बोलत असत. 'आणि त्यांमध्यें जे खरे धर्मशील गृहस्थ त्यांस वाटत, त्यांची ते प्रशंसा करीत असत.

धर्मकृत्यांच्या मोठेपणाविषयीं गोष्टी निघत तेव्हां ते नेहमीं असें ह्मणत कीं, "लोकांत धर्मश्रद्धा असल्यावांचून त्यांच्या हातून मोठीं धर्मकृत्यें व्हावयाचीं नाहींत." मुंबईसारख्या शहरांत इतर कांहीं जातींच्या गरीब लोकांस विश्रामस्थानें मोठीं मोठीं बांधिलेलीं आहेत, तशीं आह्मां हिंदु लोकांतल्या गरीबांकरितां नाहींत, ह्याचें कारण काय असा प्रश्न निघावा, तेव्हां त्यांनीं ह्मणावें कीं, "आपणांत धर्मश्रद्धा कमी आहे, हें त्याचें मुख्य कारण आहे." विचार करून पाहिला असतां हें ह्मणणें खरें दिसतें.

जावजी शेट स्वधर्माप्रमाणें वागणारे खरे हिंदु होते; परंतु,

धर्मवेडे नव्हते. धर्म ह्मणजे परमेश्वरप्राप्तीचा पवित्र मार्ग असें ते समजत असत. आणखी जे कोणी धर्मप्रवर्तक ह्मणून आजपर्यंत होऊन गेले, त्यांनीं सगळ्या आपल्या लोकांच्या समजुतींस पटत, आणि सुसाध्य होत, असे धर्ममार्ग, कालदेशवर्तमान पाहून, लावून दिले आहेत, ते चांगले आहेत, असें त्यांस वाटे. ह्याचेंच पर्यवसान पुढें असें निघे कीं, धर्माचारांत, कालदेशवर्तमानानुरूप फेरबदल होणें आवश्यक आहे. आणि ते फेरबदल, लोकांच्या पुढाऱ्यांनीं, केवळ शब्दपांडित्यांत नव्हे, तर, आपल्या कृतींत, संकटें सोसून, आणि घस खाऊन, उत्तम प्रकारें प्रविष्ट केले पाहिजेत. ह्मणजे, धर्मप्रचारक जे आहेत, ते "बोले तैसा चाले" असे पाहिजेत.

आपल्या जातींत धर्मसंबंधीं आणि कांहीं लोकहिताची व्यवस्था असावी, अशी त्यांची फार इच्छा असे. आणि त्याविषयीं ते प्रसंगविशेषीं प्रयत्न करीत असत. त्यांच्या जातीमध्यें तात्या बाबाजी राऊत ह्या नांवाचे कोणी चांगले गृहस्थ सरकारी कामदार होऊन गेले. ते जातीचे पाटील असत. त्यांनीं आपल्या मृत्युपत्रांत जातीच्या सोईकरितां बरीच रक्कम देण्याविषयीं लिहून ठेविलें होतें. त्याप्रमाणें त्या रकमेच्या खर्चानें एक मोठी धर्मशाळा बांधिली. पण, पुढें तिची नीट व्यवस्था ठेवण्याची आणि दागदुजी कर-

ण्याची पंचाईत पडली. तिचा विचार करितांना जावजींनीं असें सुचविलें कीं, जातीच्या धर्मकृत्याकरितां, प्रत्येक कुटुंबानें, यथाशक्ति, प्रतिवर्षी, एक आण्यापासून दोन रुपयेपर्यंत वर्गणी द्यावी. आणखी अशा प्रकारें जो पैसा जमेल तो पंचांच्या स्वाधीन सेव्हिंग ब्यांकेंत असावा. आणि पंचांनीं, जातीच्या अनुमतानें, त्या पैशांतली कांहीं रक्कम ह्या वर सांगितलेल्या धर्मशाळेच्या दागदुजीस लावावी, आणि जातींत कोणी अनाथ मृत झाला तर त्याच्या प्रेताच्या दहनास दहा रुपये द्यावे. ही सगळी व्यवस्था अंमलांत आणण्यास जावजी शेट ह्यांस पुष्कळ प्रयास पडले. पण, ती त्यांच्या हातून सुरळीतपणें शेवटास गेली; आणि ती आतां यथास्थित चालली आहे.

जावजींचीं व्यवहारमतें हीं फार चांगलीं असत. आणखी, नित्याच्या अवलोकनानें ह्मणा किंवा चांगल्या पुरुषांच्या सहवासानें ह्मणा, त्यांस पुष्कळ चतुरस्रपणा प्राप्त झाला होता. ते निस्पृह व निष्पक्षपाती असत, त्याच्या योगानें त्यांच्या जातींतले आणि परजातींतले देखील लहान मोठे अनेक तंटे त्यांजकडे येत असत. आणि त्यांचा निकाल ते करीत, तो उभय पक्षांस मान्य होत असे. ह्यांतलें मूळबीज असें असे कीं, ते जें काय सांगत तें अगदीं न्याय्य असे हें एक; आणि त्यांतल्या विशेष समजदार पक्षास, मोठेपणा दे-

ऊन, किंचित घस सोसण्यास ते कबूल करीत, हें दुसरें: आणि कदाचित् एकाद्या पक्षास त्यांचा निर्णय मान्य झाला नाहीं, तरी त्यांस त्याचें तिळभर देखील वाईट वाटत नसे.

आपल्या देशाचें राज्य इंग्रजांनीं घेतलें आहे, आपले हातीं राहिलें नाहीं, ह्याविषयीं गोष्टी निघत तेव्हां ते ह्मणत कीं, "ह्यांत इंग्रजांचा कांहींएक दोष नाहीं. आपलें राज्य आपणांस संभाळितां आलें नाहीं, ह्मणून त्यांनीं घेतलें. ह्यांत त्यांनीं विलक्षण तें काय केलें? त्यांनीं अद्याप अफगाणिस्थानाचें राज्य किंवा चिनाचें राज्य कां घेतलें नाहीं? तें राज्य त्या त्या देशचे लोक संभाळून ठेवितात आहेत ह्मणून. तें आपल्याच्यानें झालें नाहीं, हें आपलें उणेपण आहे." खरें आहे.

व्यापार परक्या लोकांनीं व्यापिला ह्मणून जी ओरड चालली आहे, तिच्या संबंधानें त्यांचें मत असेंच होतें. ते असें ह्मणत कीं, "आमच्या लोकांत ऐक्य नाहीं, आणि छाती नाहीं, ह्मणून व्यापार परक्यांच्या हातीं गेला आहे. आमच्या देशांत खंडीभर पैसे आहेत, ते काढून, एकीनें जर व्यापार चालविला, आणि त्या व्यापाराकडे आपल्या लोकांचीं मनें वळवून घेतलीं, तर, आपला सगळा—किंवा निदान पुष्कळ—व्यापार आपल्या हातीं परत येईल, असें त्यांचें मत असे. आलीकडे कांहीं लोक थोडीशी कला शिकून, तिचा मोठा

कारखाना घालण्याचा प्रयत्न करतात, कंपनी मिळवायास पाहतात, आणि लाखों रुपयांचें भांडवल जमविण्याची खटपट करितात. पण, तें न साधल्यामुळें त्यांचे विचार जागचेजागीं राहातात. ह्याविषयीं त्यांचें ह्मणणें असें असे कीं, एवढा पसारा करण्याचा मुळीं आव घालूं नये. पक्या रंगाचा कारखाना काढण्यास लाखों रुपयांचें भांडवल आणि कंपनीच कशास पाहिजे? पागोट्यांस पक्का रंग देण्याचें लहानसें दुकान काढिलें, तर त्यास काम पुष्कळ मिळून पैसे पुष्कळ मिळतील." असें ते ह्मणत असत. त्यांत पुष्कळ सत्य आहे.

दुसऱ्यांच्या मनास आणि त्यांत विशेषेंकरून आपल्या जातींच्या लोकांच्या मनास दुखवावयाचें नाहीं, अशी त्यांची मुख्य रीति असे. आपल्या छापखान्यांत छापलेल्या पुस्तकांतला मजकूर वाचून देखील कोणास वाईट वाटूं नये, अशी त्यांची फार इच्छा असे. बालबोधांत जीं चरित्रें येतात, त्यांत केवळ गुणांचें मात्र वर्णन असतें, दुर्गुणाविषयीं एक शब्दही कधीं येत नाहीं, हें फल त्यांच्याच ब्रीदाचें होय. त्यांनीं नेहमीं असें ह्मणावें कीं, "आपल्याला लोकांच्या दुर्गुणांशीं काय करावयाचें आहे; गुण तेवढे घ्यावे ह्मणजे झालें." कोकिलाच्या आंगच्या काळेपणाशीं आपणांस काय करावयाचें आहे? त्याचा मधुर स्वर ऐकून समाधान पावावें, ह्मणजे बस्स आहे. असा त्यांचा आशय असे. थोड्या दिवसां-

.... ग्रंथालय, ....

मागें एक ख्रिस्ती पुस्तक, एका ख्रिस्ती मंडळीनें त्यांच्या छापखान्यांत छापविलें होतें. त्यांत श्रीकृष्णाची फार निंदा केली होती. ती वाचून कितीएक हिंदुधर्माभिमानी जनांस वाईट वाटलें; आणि त्यांनीं त्याबद्दल जावजी शेट ह्यांजवर बरेंच मोठें काहूर आणण्याचा घाट घातला होता. त्यांत केवळ नुसता धर्माभिमानच नव्हता; तर त्यांत मत्सराचाही प्रादुर्भाव बराच होता. हें काम जावजी शेट आजारी असतांना त्यांच्या अपरोक्ष त्यांच्या कारखान्यांतील माणसांच्या हातून छापलें गेलें होतें, तरी, तो सर्व प्रकार समजून, जावजी शेटजींनीं त्या मंडळीची क्षमा मागितली. आणखी, ख्रिस्ती मित्रांस साफ असें सांगितलें कीं, "तुमच्या ज्या पुस्तकांत कोणाची निंदा असेल, तें आह्मी कधीं छापणार नाहीं;" आणि तशा प्रकारचीं पुस्तकें छापायास घ्यावयाचीं नाहींत, असा त्यांनीं नियम केला. ह्या नियमाच्या योगानें, दरसालचें दोनतीन हजार रुपयांचें छपाईचें काम त्यांचें गेलें. तरी त्यांनीं त्याची परवा केली नाहीं. आणखी, अशा प्रकारची चूक पुनः होऊं नये, आणि काम घेण्याची व्यवस्था नीट लागावी, ह्मणून छापण्यास पुस्तकें वगैरे घेण्याविषयीं त्यांनीं कांहीं नियम ठरवून टाकिले आहेत, ते असेः—

१. पुस्तकांत सरकारच्या विरुद्ध, कोणत्याही धर्माचे विरुद्ध, कोणत्याही व्यक्तीच्या विरुद्ध, किंवा कांहीं बीभत्स शब्द असल्यास या छापखान्यांत तें काम छापलें जाणार नाहीं.

२. पुस्तक छापून तयार झालें ह्मणजे त्याचे सर्व पैसे चुकते करून सर्व पुस्तकें नेलीं पाहिजेत.

३. थोडे पैसे देऊन थोडकीं पुस्तकें मागितल्यास मिळणार नाहींत.

४. फार्मामध्यें एक, दोन, किंवा अर्धा पेज कोरा गेल्यास त्याचे पैसे कमी केले जाणार नाहींत.

५. पुस्तकाचे कापीबरहुकूम आह्मी कंपोझ करून दोन वेळ प्रुफें देत जाऊं. त्यांत कापीविरहित फेरफार केल्यास प्रत्येक वेळेस एका फार्माचे प्रुफांस एक एक रुपया ठरविलेल्या दरापेक्षां जास्त द्यावा लागेल.

६. कामास जितके कागद लागतील ते विकत घेण्याकरितां त्यांचे सर्व पैसे पहिल्यानें दिले पाहिजेत.

७. कागद तुह्मीं दिले तर खराबीकरितां दर फार्मास १० कागद नियमापेक्षां जास्त दिले पाहिजेत.

ज्या कोणास ह्या छापखान्यांत काम छापण्यास देणें असेल त्यांनीं वरील सर्व सूचना वाचून याखालीं सही करण्याची मेहेरबानी करावी.

इंग्लिश लोकांमध्यें जे अनेक चांगले गुण आहेत, त्यांत एक मोठा गुण असा आहे कीं, कोणतेंही काम एकदां हातीं घेतलें, ह्मणजे मग त्यापासून नफा किंवा नुकसान काय होईल तें पाहावयाचें नाहीं; तर, तें काम चांगलें कसें होईल, इकडे सगळें लक्ष ठेवावयाचें; आणि त्यावरून लौकिक मिळवावयाचा. हा गुण जावजींमध्यें उत्तम प्रकारें वसत होता. त्यांच्या कारखान्यांतल्या बारीकसारीक कामांची सगळी माहिती जर मिळविली, तर, तींत ह्या गुणाचीं उ-

दाहरणें पुष्कळ सांपडतील. त्यांची माहिती आह्मांस नाहीं. परंतु, बालबोध, काव्यमाला, आणि काव्यसंग्रह, हीं मासिक पुस्तकें छापण्याचा जो क्रम चालला आहे, तो त्यांतलाच आहे, असें शोधांतीं दिसून येईल. बालबोधाची गोष्ट आतां किंचित् वेगळी झाली आहे. ती असो. पण, काव्यमाला आणि काव्यसंग्रह हीं पुस्तकें जीं इतकीं वर्णनीय निघत आहेत, त्यांस खर्च पुष्कळ लागत आहे, आणि त्या मानानें त्यांत उत्पन्न कांहीं नाहीं—सध्या बरेंच नुकसान आहे—ह्मटलें तरी चालेल. चांगलें काम चांगलें करावयाचें, हें त्यांचें मुख्य तत्त्व होतें. ते आपल्या लौकिकास फार जपत असत. छापणारांच्या धांदलीनें जर कांहीं कागदांचें छापणें सरासरी झालें, तर ते कागद रद्द करून फाडून टाकवावे, आपल्या कारखान्याबाहेर जाऊं देऊं नयेत, अशा गोष्टी पुष्कळ वेळां घडल्या आहेत. आणि हें तत्त्व सर्व प्रकारच्या कामांत ते पाळीत असत. आणखी त्यांच्या कारखान्याच्या चांगुलपणाचा, ह्मणजे,—छापणें चांगलें, कागद चांगला, बांधणें चांगलें,—असा जो मोठा लौकिक झाला आहे, त्याचें बीज हेंच आहे.

चांगलें काम चांगलें करावयाचें, हें त्यांचें तत्त्व पुस्तकप्रसिद्धींतही पुष्कळ दृश्यमान झालें आहे. आणि तें त्यांच्या लौकिकास कारण झालें आहे. रघुवंश महाकाव्य मूळ कालि-

दासाचें; त्याचें भाषांतर वे० शा० सं० रा० रा० गणेशशास्त्री लेले त्र्यंबककर ह्यांनीं केलेलें; तें दक्षिणा प्रैझ कमिटीनें पसंत करून शास्त्रीबावांस पांचशें रुपये बक्षीस दिलेलें; तें पुस्तक शास्त्रीबावांपासून विकत घेऊन जावजी शेटनीं छापिलें. तें बरेंच मोठें झालें आहे. त्याची किंमत अगदीं माफक तरी दोन रुपये ठेवावी लागली आहे. त्याच्या एक हजार प्रती छापल्या आहेत. त्यास आज ९ वर्षें झालीं. त्यांतल्या शेंदीडशें तरी प्रती विकल्या आहेत कीं नाहींत, ही शंका आहे. तरी त्याविषयीं जावजी शेटजींच्या तोंडांतून कधीं एक अक्षर निघालें नाहीं. आणखी असा प्रकार दुसऱ्या कितीएक चांगल्या पुस्तकांचा झाला आहे. पण त्याविषयीं ते कधीं एक अक्षर देखील बोलत नसत. कां कीं, चांगलें काम चांगलें करावयाचें, हें त्यांचें ब्रीद होतें.

शिवाय "नसावें ओशाळ, मग मानिती सकळ," ह्या तत्त्वावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. "माझें येणें असो, पण मी कोणाचें देणें नसो" असें त्यांनीं नित्य ह्मणावें, आणि त्याप्रमाणें वागावें. त्यांनीं कधीं कोणाची एक पै बुडविली नाहीं. तेणेंकरून त्यांचा मान सर्वत्र होत असे.

ह्यावरून सहज लक्षांत येईल कीं, जावजींचीं धर्ममतें आणि व्यवहारमतें अशीं होतीं कीं, त्यांस अनुसरून वागल्यानें त्यांचें हित झालें. हें फार चांगलें झालें. मतें असावीं

एका प्रकारचीं, आणि आचरण असावें वेगळ्या प्रकारचें, हें फार वाईट आहे, असें जावजींस वाटत असे. आणखी, कोणाचें नांव न घेतां, अशा प्रकारच्या माणसांची ते फार कींव करीत असत. आह्मांला असें वाटतें कीं, अशा प्रकारच्या माणसांस जनामध्यें वारंवार मान खालीं घालावी लागते, आणि अपमान सोसावा लागतो. ह्मणून, मतें धारण करावयाचीं तीं फार विचारानें, कालदेशवर्तमान पाहून करावीं. ह्या कामांत सांप्रत काळीं पुष्कळांच्या हातून चूक होत असते. ती चूक, आमच्या देशांतले जातिधर्मांचे परिपाठ आणि पाश्चिमात्य शिक्षण ह्यांची चुकामूक पडल्यामुळें होते. ह्मणजे, आमच्या जातिधर्मांच्या योगानें आमचे ठायीं समजुती आणि व्यवहार एका प्रकारचे बसलेले असतात, आणि पाश्चिमात्य विद्येच्या योगानें समजुती अगदीं वेगळ्या प्रकारच्या होतात. पाश्चिमात्य शिक्षण मनांत असें भरवितें कीं, विधवापुनर्विवाह, बालविवाहनिषेध, विधवावपननिषेध, निराकारईश्वरभक्ति, जातिभेदनिषेध, ह्यांचा प्रघात पडला पाहिजे, आणि इकडे घरांत पाहावें तों ह्या गोष्टींचें नुसतें नांवदेखील काढितां कामास नये. ह्यामुळें एकंदर वर्तनांत मोठ्या अडचणी येतात, आणि विपर्यास येतो. ह्याविषयीं जावजींचें मत असें होतें कीं, "अशीं जीं नवीं मतें चांगलींशीं वाटतात, त्यांचा जितका अंश आपणाच्यानें आपल्या आचरणांत आणतां

येण्यासारखा असेल, तितका अंश मात्र आपण पतकरल्याचें दाखवावें; अधिक पतकरल्याचें दाखवूं नये, ह्मणजे झालें." ही गोष्ट खरी आहे.

आतां ही एक गोष्ट निर्विवाद आहे कीं, स्वभाव हा मतांचा परिणाम आहे. किंबहुना मतें हें कारण आणि स्वभाव हें कार्य आहे, असें ह्मटलें तरी चालेल. ह्मणून, जावजी शेटजींचीं मतें आह्मीं वर सांगितलीं आहेत, त्यांवरून त्यांच्या स्वभावाचें सामान्य स्वरूप वाचकांच्या लक्षांत सहज येण्यासारखें आहे. त्यांच्या स्वभावांत एक गुण अप्रतिम होता. त्याच्या योगानें त्यांच्या इतर गुणांस फार शोभा येत असे. तो गुण कोणता, तर सात्त्विकपणा—किंवा आपली खरी योग्यता समजून जगांत वागणें. त्यांस आलीकडे बड्या लोकांच्या यादींत घातलें होतें, आणि त्यांस गव्हरनर साहेबांच्या येथें जाफतीस आमंत्रण येत असे. ते त्या प्रसंगास काय ते एकदा गेले होते. पुनः गेले नाहींत. ह्याचें कारण असें कीं, तें आमंत्रण आपल्या योग्यतेपेक्षां अधिक आहे, असें त्यांस वाटलें. त्याप्रमाणेंच त्यांस आलीकडे जस्टिस आफ् धि पीस ही मानाची पदवी सरकारानें दिली होती. ती त्यांनीं आपण होऊन नको ह्मटली होती. आणखी ती त्यांजवर सरकारानें बळेंच लादल्याचें प्रसिद्ध झाल्यावर त्यांची माझी प्रथम गांठ पडली तेव्हां ते ह्मणाले, "ह्या पद-

वीचा अर्थ देखील मला कळत नाहीं, ही मला हवी कशाला? राजाराम शास्त्री भागवतांसारख्यांस टाकून ही पदवी सरकार आह्मांसारख्यांस देतें, ह्यास काय ह्मणावें?"

एके वेळीं एका मोठ्या सुज्ञ राजानें, छापखान्याचे आख्येवरून, त्यांस भेटीस बोलाविलें, त्याप्रमाणें ते त्यांच्या बंगल्यावर गेले. आणि त्यांची व महाराजांची भेट होत होती इतक्यांत, दुसरे कोणी गृहस्थ महाराजांच्या दर्शनास आल्याचें कळल्यावरून महाराजांनीं जावजींस सांगितलें कीं, "तुह्मी आतां पुनः दुसऱ्या वेळेस या." तें ऐकून जावजी निमूटपणें घरीं आले, आणि पुनः त्यांस भेटायास गेले नाहींत, ह्यास कारण दुरभिमान किंवा अहंपणा नव्हे, तर, एवढे मोठे महाराज आपणांस कसचे भेटतात, असें ह्मणून, नेमस्तवृत्तीनें ते मागें राहिले. त्याप्रमाणेंच, कांहीं मित्रांच्या सूचनेवरून, दुसऱ्या एका महाराजांस, कांहीं पुस्तकें नजर करण्यास बरोबर घेऊन, ते त्यांच्या बंगल्याजवळ गेले असतां, आपणांस राजा कशाचा भेटतो, असें त्यांच्या मनांत येऊन ते तेथून तसेच परत आले. सारांश, ते आपणांस लहान मानून चालत होते; आणि आपणांस "लहानाहुनी लहान" मानणें हेंच उत्तम ज्ञानप्राप्तीचें उत्तम फल होय.

त्यांस आत्मस्तुतीचा कंटाळा असे. हेमंतोत्सवांतलीं व्याख्यानें छापून प्रसिद्ध करण्याचा क्रम त्यांनीं चालविल्यावरून,

माधवबागेंत, सभेमध्यें, ऑ० काशिनाथ त्रिंबक तेलंग ह्यांनीं त्यांची स्तुति केली. ती कानीं पडल्याबरोबर ते मागें सरून खालीं मान घालून उभे राहिले. "महिमे लपे वेडियां माजि" असें ज्ञानोबांनीं ह्मटलें आहे, त्याची आठवण होते. परोपकारार्थ खरचिलेल्या रकमेच्या संबंधानें नांव प्रगट करण्याचा प्रसंग आलाच, तर, "मराठ्यांचा हितचिंतक" असें नांव ते सांगत.

तसेच ते लक्षाधीश झाले होते, तरी, गाड्याघोड्यांचा डामडौल त्यांनीं कधीं केला नाहीं. त्याविषयीं कधीं गोष्ट निघाली तर त्यांनीं ह्मणावें कीं, "आपल्याला गरीबाला तो थाटमाट कशाला पाहिजे?" आणखी खरोखरच, त्यांच्या राहण्याच्या रीतीवरून ते मोठे श्रीमंत आहेत, असें कोणास वाटत नसे.

एकंदरींत धर्ममतें, व्यवहारमतें आणि स्वभाव ह्यांच्या संबंधानें जावजी शेट ह्यांचें आचरण कित्ता घेण्यासारखें होतें.



# भाग साहावा.

## शेवटचे दिवस आणि अंतकाल.

मलाही तसें खास लागेल जावें
असें नित्य अभ्यंतरीं आठवावें
न देवापुढें होय खालीं पहावें
प्रकारें अशा आयु हें घालवावें.

बालबोध.

अंतकाळ येतां येतां
तेथें नये चुकवितां.

तुकाराम.

आवजी शेट मोठे चौकस होते. त्यांचें ग्रंथावलोकन फारसें नव्हतें, तरी, ग्रंथावलोकनापासून जो संस्कार मनास होत असतो, तो संस्कार त्यांनीं, अनेक विद्वान जनांशीं संभाषणें करून संपादिला होता. मनुष्य हा, एकाद्या आंदोलकाप्रमाणें, सुख आणि दुःख ह्या दोहों बाजूंस क्रमाक्रमानें वळत असतो—ह्मणजे, मनुष्यास,

# विठोबा जावजी.



| जन्म. | मृत्यु. |
| --- | --- |
| पौष शुद्ध ११ शके १७८८. | कार्तिक वद्य ८ शके १८१२. |

सुखामागें दुःख आणि दुःखामागें सुख अशीं क्रमानें भोगावीं लागतात, ह्यावर त्यांचा विश्वास बसला होता. आणि असा योग आपणांवर आल्याचा संशय त्यांस येत असे. त्यांचा मधला मुलगा विठोबा हा, तारीख ४ माहे डिसेंबर सन १८९० रोजीं, क्षयरोगानें मरण पावला. हा मुलगा मोठा बुद्धिवान, आणि चपळ असून, घरचीं आणि कारखान्यांतलीं कामें आटपूं लागला होता. आणखी एकदोन वर्षांत त्यानें सगळीं कामें आपल्या स्वतःच्या शिरावर घेऊन चालविलीं असतीं, असें सर्वांस वाटत होतें. असा, हातातोंडास आलेला, कर्ता झालेला मुलगा गत झाला—वाढलेलें पान ओढून नेल्यासारखें झालें—त्यानें जावजी शेट ह्यांच्या प्रकृतीस फार मोठा धक्का बसला. त्यांस अतिशयित शोक झाला. ते विचारी आणि धैर्यशाली होते, तरी, विठोबाचें स्मरण झालें ह्मणजे त्यांचा कंठ दाटून येई, आणि, डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागत. पुत्रशोकाचा धक्का फार कठिण आहे. इंग्लंडांतला नामांकित वक्ता आणि तत्त्ववेत्ता पुरुष, एडमंड बर्क, ह्याचा मुलगा मरण पावला, तेव्हां, तो देखील, सर्व तत्त्वज्ञान विसरून, पोरासारखा रडून ह्मणाला कीं, "अरे, ज्यानें मला स्मशानांत न्यावें, त्याला मी स्मशानांत नेतों आँ!" तेव्हां, जावजींस पुत्रशोकाचा मोठा धक्का बसावा, आणि त्यांस वारंवार शोक व्हावा, ह्यांत काय नवल आहे? विठोबाच्या मरणानंतर प्र-

थम त्यांची माझी भेट झाली, तेव्हां त्यांस फार मोठा हुंदका आला. त्या वेळीं त्यांच्या तोंडांतून असे उद्गार निघाले कीं, "झालें; आटपलें; आतां जगण्याची कांहीं मजा नाहीं. राहिलेले दिवस आतां कसे तरी घालवायाचे, एवढेंच." आणखी, ह्या वेळापासून त्यांच्या मनानें असें घेतलें होतें कीं, आपल्या उन्नतीचा कळस व्हावयाचा होता तो होऊन, आतां उतार लागला आहे. अशा प्रकारचें भाषण त्यांनीं मजपाशीं कधीं केलें नाहीं. परंतु जवळच्या विशेष परिचित मंडळीच्या सांगण्यावरून असें दिसतें कीं, अशा प्रकारचे उद्गार त्यांच्या तोंडांतून वारंवार निघत असत. ह्मणजे,

[ मरे एक त्याचा दुजा शोक वाहे
अकस्मात तोही पुढें जात आहे.]

असें जें समर्थांनीं ह्मणून ठेविलें आहे, त्याचें स्मरण ह्या प्रसंगीं फार होतें. विठोबाचा शोक वाहतां वाहतां जावजी गेले!! असो.

जावजींनीं विठोबाचें स्मारक करून ठेविलें आहे. तें असें. चारपांच हजार रुपये खरचून त्यांनीं एक लहानशी धर्मशाळा महालक्ष्मीस बांधिली आहे. तींत कांहीं कुटुंबें राहण्याची सोय केली आहे. तिचें भाडें सुमारें पंधरा रुपये दरमहा येतें. ती रकम त्याच इमारतीच्या आणि दुसऱ्या एका धर्मशाळेच्या दागदुजीकडे खरचावी, अशी तजवीज

लावून ठेविली आहे. ह्या दोन्ही धर्मशाळा-त्यांच्या जातीच्या मोठ्या कार्यप्रयोजनास उपयोगीं पडत असतात.

आपल्या सुखास उतरती कळा लागली आहे, असें जरी जावजींच्या मनास वारंवार वाटत असे, तरी, त्यांनीं हिंमत सोडिली नव्हती. मृत माणसांचा शोक करीत बसणें हें कोणत्याही प्रकारें लाभदायक नाहीं—ह्मणजे त्यापासून मृतास सुख नाहीं आणि जीवंतासही सुख नाहीं—हें ते जाणून होते. आणखी आपण हातपाय गाळले असतां घरांतल्या बाकीच्या मंडळीची हिंमत खचेल, असें त्यांस ठाऊक होतें. ह्मणून, ते, पूर्वींप्रमाणें आपलीं कामें काजें पाहात असत. परंतु, त्यांस फार दिवसांपासून, कफाची आणि खोकल्याची जी व्यथा जडली होती, ती दिवसेंदिवस वाढत चालली, आणि त्या मानानें त्यांची शक्ति कमी कमी होत चालली. त्यांस उदराची भावना झाली. आणि तेणेंकरून, गेल्या मार्च महिन्याच्या आरंभीं त्यांच्या शरीरीं फार असमाधान झालें. आणि ते विशेष औषधोपचार करूं लागले.

औषधोपचाराविषयीं त्यांच्या समजुती दृढ झालेल्या होत्या. कांहीं अडाणी लोकांस विलक्षण औषधी ठाऊक असतात—त्या मोठ्या मोठ्या डाक्टरांच्या स्वप्नींही नसतात—असें जरी त्यांचें मत होतें, तरी, आलीकडच्या पाश्चिमात्य वैद्यकावर त्यांचा विश्वास मनस्वी होता. ते कै० अनंत चंद्रोबा ह्यांची

वाखाणणी फार करीत असत. आणखी आलीकडे त्यांचा पूर्ण विश्वास डाक्टर अण्णा मोरेश्वर कुंटे ह्यांवर बसला होता. डा० अण्णांपेक्षां उत्तम डाक्टर व्हावयाचा नाहीं, अशी त्यांची खातरी झाली होती. अण्णांचें औषध बदलून दुसऱ्या डाक्टरांचें औषध घ्यावें, असें कोणीं ह्मटलेलें त्यांस मुळींच आवडत नसे. त्यांस कोणीं एका गृहस्थानें अण्णांचें औषध बंद ठेवून दुसऱ्या एका डाक्टराचें औषध घेण्याचा विशेष आग्रह चालविला, तेव्हां ते रागावून असें ह्मणाले कीं, "अण्णांनीं विष दिलें तरी तें मी पिईन; मला दुसऱ्याचें अमृत नको; मरायाचेंच आहे, तर मला अण्णांच्याच हातून मरूं द्या." अण्णांवर त्यांची एवढी निष्ठा होती, ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कां कीं, त्यांचा उभयतांचा स्नेह तसाच दृढ होता.

डाक्टर अण्णा कुंटे आणि दुसरे कितीएक नामांकित वैद्य ह्यांनीं नानाप्रकारचीं औषधें देऊन जावजींस बरें करण्याचे पुष्कळ प्रयत्न केले. परंतु, रोग कांहीं केल्या मागें हटेना. त्याचें पाऊल दिवसेंदिवस पुढें पुढें पडूं लागलें. पोट मोठें दिसूं लागलें, पायांस सूज आली, आणि अन्नावर अरुचि अतिशयित झाली. तेव्हां जवळच्या मंडळीस किंचित् भय वाटलें. तरी जावजी शेट मोठ्या धीराचे होते. ते घा-

बरले नाहींत. आणखी, त्यांचा अंत इतका सन्निध आला आहे, असें कोणालाही वाटलें नाहीं. कसें झालें तरी मृगापर्यंत दिवस लोटतील, असा अजमास पुष्कळांचा होता. परंतु, रामनवमीच्या दिवशीं दुपारून रोगाची फारच उचल झाली. आणि नानाप्रकारचे उपाय करतां करतां, त्यांस रात्रीं सुमारें साडेअकरा वाजण्याच्या सुमारास, उगाच एक उचकी आल्यासारखें होऊन त्यांचें देहावसान झालें. अशाप्रकारें जावजी शेट ह्यांची ह्या लोकची यात्रा संपली.

अनायासेन मरणं

विना दैन्येन जीवनम्

असें जिणें हें उत्तम मानिलें आहे, तें जावजी शेटजींनीं साधिलें. ह्याहून अधिक तें काय मिळवायाचें होतें ?

जावजी हे अजाणाचे सुजाण झाले; गरीबाचे श्रीमंत झाले; अप्रसिद्धाचे प्रसिद्ध झाले; कोणास ठाऊक नव्हते, ते लोकमान्य झाले, राजमान्य झाले; आणि आमच्या राष्ट्राच्या उद्धारास ज्या कलांची वृद्धि आवश्यक आहे, त्या कलांपैकीं एका कलेच्या उन्नतीस पुष्कळ आधारभूत झाले; आणखी, ज्यांचा ज्यांचा ह्मणून संबंध त्यांशीं आला, त्या सर्वांकडून, आबालवृद्धांकडून, त्यांनीं चांगलें चांगलें ह्मणून घेतलें. ह्यापेक्षां ह्या लोकचें उत्तम कर्तव्य तें काय राहिलें बरें ?

एके वेळीं ड्यूक आफ् वेलिंग्टन ह्मणाला, "आपलें कर्तव्य करणें हेंच काय तें जन्माचें सार्थक्य आहे. तें जर मनुष्याच्यानें करवत नाहीं, तर न जगावें हें बरें." इंग्लंडाचा दुसरा एक मोठा सरदार नेलसन हा ह्मणत असे कीं, "इंग्लंड हें प्रत्येक माणसास असें सांगतें कीं तूं आपलें कर्तव्य कर." ट्राफलगार येथें लढाईंत त्याचें देहावसान होण्याच्या अमळ आधीं तो ह्मणाला, "मीं आपलें कर्तव्य केलें आहे. तें मला करण्यास सामर्थ्य दिलें, ह्मणून मी परमेश्वराचे उपकार मानितों." त्याप्रमाणें जावजी शेटजींनीं ह्मटलें असतें तर त्यांसही तें फार शोभलें असतें. त्यांनीं आपलें कर्तव्य केलें आहे. ह्मणजे ते आपल्या आत्म्याच्या, आपल्या कुटुंबाच्या माणसांच्या, आपल्या इष्टमित्रांच्या, आणि आपल्या राष्ट्राच्या ऋणांतून मुक्त झाले आहेत. तेव्हां त्यांस परमेश्वरापाशीं चिरकाल शांतिमय निवासस्थान मिळावें, हें अगदीं साहजिक आहे. कां कीं, असें जगणें हेंच मनुष्यांस प्रिय आणि परमेश्वरास मान्य आहे.



# भाग सातवा.

## त्यांविषयीं "लोक काय बोलतात."

जन्मा आलियाचें फळ
अंगीं न लागावा मळ.

तुकाराम.

देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी
मना सज्जना हेचि क्रीया धरावी.

रामदास.

मुखें सत्य, अंगें विनीत, तेणें जिंकिले जन समस्त—असें मुक्तेश्वरांनीं एके ठिकाणीं ह्मटलें आहे. त्याचें प्रमाण, इतर सत्पुरुषांच्या चरित्रांप्रमाणें, जावजी शेट ह्यांच्याही चरित्रांत दृश्यमान होतें. तें एकपक्षी नाहीं; तर सर्वत्र सारखें दिसतें. सध्याच्या काळीं राष्ट्राचीं मुखें—किंवा देशमुखें—ह्मटलीं ह्मणजे वर्तमानपत्रें होत. त्यांचीं धर्मसंबंधी, व्यवहारसंबंधी, आणि राज्यरीतिसंबंधी मतें पुष्कळ वेगळीं वेगळीं आहेत. त्यांवरून त्यांचे कलह लागतात, आणि त्यांमध्यें, एकमेकांच्या

उखाळ्यापाखाळ्या काढलेले असे लेख आलीकडे तर मनस्वी येत असतात. एका पत्रांत एकदा एक निबंध आला होता, त्याचा मथाळा **"तुह्मी कोण"** असा होता. त्याच्या विरुद्ध पक्षानें त्याचें जें उत्तर ह्मणून कांहीं दिलें, त्याचा मथाळा **"आह्मी तुमचे बाप"** असा होता. असे पुष्कळ विरुद्ध अभिप्राय पडून झगडे चालतात. आणखी मनुष्यांच्या योग्यतेविषयींचे अभिप्रायही असे भिन्न भिन्न आणि कधीं कधीं उलट पडतात. कोणी ह्मणतात, अमुकतमुक गृहस्थ बाकी सगळा ठीक आहे, पण तेवढा प्रार्थनासमाज त्याच्या डोक्यांत भरला आहे, ह्मणून त्याची घाण झाली आहे. दुसऱ्या एकाद्याविषयीं कोणाचें बोलणें असें पडतें कीं, तो स्वभावानें फार चांगला आहे, पण तेवढ्या व्यसनानें तो गेला आहे. असें पुष्कळ चालतें. पण, जावजी शेट ह्यांच्या चांगुलपणाविषयीं तसें कांहींएक नाहीं. सर्वांची एकवाक्यता आहे. त्याचे कांहीं मासले अगदीं संक्षेपतः येथें सादर करितों:—

**वृत्तसार**—हे स्वभावानें लीन असून मोठे उदार होते.

**प्रभाकर**—हे स्वभावानें फार लीन, मनमिळाऊ, व उदार होते.

**वार्ताहर**—ह्या पुरुषाचें एकंदर चरित्र मोठें वर्णनीय व मनरंजन करण्यासारखें आहे.

**बोधसुधाकर**—जावजीसारखा सततोद्योगी व दृढनिश्चयी मनमिळाऊ पुरुष थोडा सांपडेल.

**न्यायसुधा**—हे स्वतःच्याच पराक्रमानें व उद्योगबळानें एवढ्या मोठ्या नांवाजलेल्या छापखान्याचे मालक झाले.

**नासिकवृत्त**—यांचे ठायीं सौजन्य, मनमिळाऊपणा, व औदार्य या गुणांचा वास असल्यानें ते चांगले लोकप्रिय होते.

**शुद्धवऱ्हाडी**—सतत उद्योगानें, सचोटीनें, साधेपणानें आणि केवळ व्यवहारदक्षतेनें त्यांनीं आपलें नांव अमर करून सोडलें.

**मुत्सद्दी**—स्वपराक्रमानें अगदीं हलक्या स्थितींतून चढत चढत लक्षाधीश बनलेले जे लोक मुंबईंत आहेत, त्यांपैकीं हे एक होते.

**न्यायसिंधु**—निरालस्यपणानें सतत उद्योग करून हे मोठ्या योग्यतेस चढले..... ह्यांचा स्वभाव शांत, दयाळू व निगर्वी असा होता.

**सत्यशोधक**—स्वपराक्रमानें व उद्योगशालितेनें गरीब स्थितींतून मोठ्या योग्यतेस व प्रसिद्धीस आलेल्या गृहस्थांपैकीं हे एक गृहस्थ होते.

**ज्ञानोदय**—त्यांच्या छापखान्यांतील चोख कामानें व त्यांच्या सालस वृत्तीनें त्यांनीं ह्या महाराष्ट्र देशांत सर्वांची लोकप्रियता संपादन केली होती.

**महाराष्ट्रमित्र**—हे अगदीं गरीब स्थितींतून केवळ आपल्या उद्योगाच्या जोरावर मोठ्या योग्यतेस चढले....हे स्वभावानें फार लीन, मनमिळाऊ, व उदार होते.

**बालबोध**—हे गृहस्थ सुशील, आपल्या कामांत निपुण, परोपकारी, मनमिळाऊ—म्हणजे **सज्जन** म्हणण्यास जे गुण आवश्यक आहेत, त्या गुणांनीं युक्त—असे होते.

**टीचर**—हे दयाळू, उदार, वेळ पाहून काम करणारे व सरळ मनाचे असे होते. यांच्या स्वभावांत एक मोठी खुबी ही होती कीं हे गरीबांवर फार दया करीत असत.

**बकुल**—सदुद्योग व स्वपराक्रम या दोहोंच्या साहाय्यानें हे नांवालौकिकास आले. यांनीं आपले सगळे श्रम छापखान्याकडेसच घालविल्यामुळें त्या कामीं त्यांनीं फारच सुधारणा केली.

**कल्पतरु** आणि **आनंदवृत्त**—हे मूळचे साधारण स्थितींत असून ते केवळ आपल्या अंगच्या हुषारीनें व उद्योगबळानें उदयास आले.....यांचा स्वभाव मोठा मनमिळाऊ आणि वर्तन अगदीं साधें असे.

**सुबोधसिंधु**—यांनीं आपल्या उद्योगबळेंकरून सर्व हिंदुस्थानभर नांव गाजवून हिंदुस्थानांतील छापखान्याच्या धंद्यास नांवारूपास आणिलें; व लोकप्रीति संपादन करून सरकारांतूनही सन्मान मिळविला.

**करमणूक**—एकाच धंद्यांत झटून मेहेनत केल्यामुळें मनुष्य कसा उदयास चढतो, याचें हे एक प्रत्यक्ष उदाहरणच होत.....मोठेपणास चढले असून लीनता, मनमिळाऊपणा, व औदार्य हे गुण यांच्या अंगीं विशेष होते.

**ज्ञानचक्षु**—यांचा स्वभाव फारच उमदा आणि मनमिळाऊ असे....यांची वृत्ति उदार असे....नियमितपणा व व्यवस्थितपणा हे जावजी शेटच्या अंगीं अनुकरणीय गुण होते....त्यांना आत्मस्तुति अगदींही आवडत नसे.

**टैम्स आफ् इंडिया**—जावजी फार सुशील आणि मनमिळाऊ होते. आणि ह्यांचे सर्व परिचित ह्यांस फार उत्तम समजून मोठा मान देत असत. त्यांचा मृत्यु हा टैप पाडण्याच्या कामास आणि मुद्रणकलेस एक मोठा धक्का बसला आहे.

**जगद्धितेच्छु**—छापखान्यांतल्या अगदीं कमी दर्ज्याच्या नोकरीपासून आपल्या उद्योगबळानें मुंबई इलाख्यांत पहिल्या प्रतीच्या ठरलेल्या छापखान्याच्या मालकाच्या पदाला चढलेले,....खरे मेहनती, दृढ निश्चयाचे मि० जावजी दादाजी.

**बेळगांवसमाचार**—त्यांच्या कारखान्यांतील टैप मुंबई व मद्रासइलाख्यांतील कोणाच्या छापखान्यांत नाहीं असा विरळा....जरी ते इतके वैभवास चढले होते, तरी त्यांच्या अंगीं लीनता फार असे, व परोपकारबुद्धिही तशीच असे.

**जगन्मित्र**—जावजी हे मूळचे गरीब असून, केवळ आपल्या अविश्रांत उद्योगाचे योगानेंच एवढ्या मोठ्या योग्यतेस चढले होते....त्यांच्या छापखान्यांत पुस्तक छापिलें म्हणजे पुस्तकाची छपाई, व बांधणी यांचे संबंधानें लोकांना निराळी शिफारस करण्याचें प्रयोजन नसे.

**जगदादर्श**—हे अगदीं गरीब स्थितींतून केवळ आपल्या उद्योगाच्या जोरावर मोठ्या योग्यतेस चढले.....त्यांच्या अलौकिक हुषारीमुळेंच त्यांचा 'निर्णयसागर' छापखाना ह्या इलाख्यामध्यें पहिल्या प्रतीचा होऊन राहिला आहे. हे स्वभावानें फार लीन, मनमिळाऊ, व उदार होते.

**नेटिव्ह ओपिनियन**—हे अगदीं गरीब स्थितींतून केवळ आपल्या उद्योगाच्या जोरावर मोठ्या योग्यतेस चढले....त्यांच्या अलौकिक हुशारीमुळेंच त्यांचा निर्णयसागर छापखाना ह्या इलाख्यामध्यें पहिल्या प्रतीचा होऊन राहिला आहे. हे स्वभावानें फार लीन, मनमिळाऊ व उदार होते.

**काव्यसंग्रह**—जावजींची जीवनयात्रा बोधप्रद आणि उत्साहप्रद आहे.....समर्थांच्या

वचनाप्रमाणें पाहिलें तर जावजींची गणना, समर्थ ज्यांस **उत्तम पुरुष** म्हणतात, त्या कोटींत होते. अशा कोटींत ज्यांचा समावेश होईल अशीं मनुष्यें आमच्या या हतभाग्य देशांत नितांत विरळ आहेत.

**वऱ्हाडसमाचार**—नेटिवांत यांच्या तोडीचे वडे छापखानेवाले फार थोडे आहेत. छापण्याच्या देशी कलेला यांच्या परिश्रमानें सांप्रतचें उत्तम स्वरूप आलें आहे. मनुष्य आपल्या उद्योगानें व बुद्धिसामर्थ्यानें केवढा धनसंपन्न व लोकमान्य होऊं शकेल, याचें उत्कृष्ट उदाहरण रा० जावजींचें चरित्र होय.

**गुजराती**—यांचा स्वभाव फार मनमिळाऊ होता, व ज्या कोणाची यांशीं गांठ पडे ते सर्व जण यांजविषयीं मनांत पूज्यबुद्धि बाळगीत....जात्या बुद्धिवान्, हिंमतवान् व उद्योगी असल्यामुळें हे छापखानेवाल्यांच्या मंडळींत एका हिऱ्याप्रमाणें चमकत होते. मि० जावजी हे फार प्रामाणिक, सरळ, मनमिळाऊ, उदार व धीट मनुष्य होते.

**ज्ञानप्रकाश**—अगदीं गरीव स्थितींतून आपल्या अंगच्या उद्योगीपणामुळें मनुष्य कसा योग्यतेस चढतो, याचें उत्कृष्ट उदाहरण सर्वांनीं डोळ्यांपुढें ठेवण्यासारखें रा० जावजी ह्यांचें चरित्र आहे....विद्वान लोकांच्या साह्यानें वागल्यानें त्यांचे अंगची रसिकता पूर्णपणें दृष्टीस पडे....यांचा स्वभाव शांत, गरीब व मनमिळाऊ असे.

**कामगार**—हे गृहस्थ आपल्या स्वतःच्या उद्योगानें अगदीं गरीव स्थितींतून मोठ्या योग्यतेस चढले....रा० जावजी यांचा स्वभाव फारच चांगला होता....त्यांनीं विद्वान लोकांच्या समागमाचा पूर्ण लाभ घेऊन, ते आज माहितीच्या कामीं सर्व जाणत्या लोकांची बरोबरी करीत होते. मनुष्याची खरी सुधारणा कशानें होते, याचें वर्म त्यांना चांगलें समजलें होतें.

**कयसरे हिंद**—दोन रुपड्यांच्या पगाराच्या एका क्षुल्लक कामगारावरून वाढून हे एका मोठ्या कारखान्याचे मालक व शेंकडों माणसांचे पोशिंदे झाले होते. तरी कारखान्यांतील एकाद्या साध्या व गरीब नोकराप्रमाणें त्यांच्यांत खपून मेहेनत करीत असत. यांच्याजवळ पुष्कळ द्रव्य होतें तरी मगरुरी किंवा मिजास यांपासून ते दूर होते. त्यांची सभ्यता व लायकी हेच त्यांचे मोठे गुण होते.

**इंदुप्रकाश**—आपल्या दृढ उद्योगानें आपल्या कर्तबगारीच्या पराक्रमावर अत्यंत निकृष्ट अवस्थेपासून चांगल्या उच्च स्थितीप्रत जे लोक पावले आहेत, त्यांतीलच जावजी दादाजी हे एक उत्कृष्ट उदाहरण होत....“शीलं परं भूषणम्” ह्याचें सादृश्य त्यांचे ठायीं होतें.....मोठी हानि झाली आहे. रा० रा० जावजी शेटचे मित्र जर त्यांचें चरित्र लिहितील, तर तें फार बोधप्रद आणि कित्ता घेण्यासारखें होईल.

**बडोदावत्सल**—हे पूर्वी अगदीं गरीब स्थितींतील असतांही आपल्या बुद्धिचापल्यानें, दृढउद्योगानें आणि मनमिळाऊ स्वभावानें फार मोठ्या योग्यतेस चढले....यांच्या आंगीं व्यवहारज्ञान व विचारशक्ति इतकी उत्तम होती कीं, ते जें जें काम हातीं घेत, तें तें फार सावधगिरीनें व काळजीपूर्वक करीत असत.....हाताखालच्या लोकांस वागवून घेण्याची यांची रीत वर्णनीय होती.....दुष्ट काळानें हजारांचें प्रियरत्न जे जावजी शेट त्यांस जगांतून नाहींसें केलें.

**चिकित्सक**—यांनीं केवळ गरीब स्थितींत वाढून आपल्या उद्योग, दृढनिश्चय व चातुर्यबलावर लक्षाधीशांमध्यें आपली गणना करविली; मुंबई इलाख्यांतीलच नव्हे, परंतु आज हिंदुस्थानांतील मुद्रणकलेस खऱ्या ऊर्जित दशेस आणिलें.....शांतता, लोकप्रियता, गंभीरपणा, सचोटी या गुणांविषयीं मि० जावजींनीं आपलें जगाकडून वर्णन करून घेतलें आहे. जावजींच्या मरणानें आज मुंबई इलाख्यांतील छापखानेवाल्यांचें भूषणच गेलें म्हणण्यास हरकत नाहीं.

**बांबे ग्याझेट**—ह्यांस थोड्या दिवसांमागें मुंबईसरकारानें जस्टिस आफ् धि पीस हा मानाचा किताब दिला. त्याचा उपभोग घेण्यास व तत्संबंधानें लोकांस उपयोगी पडण्यास ते फार दिवस राहिले नाहींत. जावजी मेल्यामुळें मुद्रणकलेच्या धंद्यांतला एक मोठा खंदा व खटपटी मनुष्य नाहींसा झाला आहे. ह्यांनीं अनेक उपयुक्त संस्कृत, हिंदुस्थानी, मराठी आणि गुजराथी ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. ह्यांचा टैप पाडण्याचा आणि छापण्याचा कारखाना फार मोठा आहे.

**सुधारक**—आमच्या इकडे छापखान्यांस जी ऊर्जित दशा आली आहे, ती बऱ्याच अंशानें यांच्या मेहनतीचें फळ होय. यांच्या आयुष्यक्रमांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे त्यांची मूळची स्थिति फार गरीबीची असून केवळ आपल्या उद्योगाच्या व नेकीच्या बळावर ते इतक्या प्रसिद्धीस आले. आजपर्यंत त्यांच्या साह्यानें जें अनेक संस्कृत मराठी ग्रंथांचें प्रकाशन झालें आहे, तें मनांत आणितां त्यांच्या हातून विद्यावृद्धीच्या प्रसारास किती मदत झाली आहे हें कोणासही दिसून येणारें आहे.

**अरुणोदय**—तीन रुपये दरमहा घेऊन दगडावर टैप घांशीत बसणारें त्या वेळचें तें पोर पुढें अशा योग्यतेस येईल, असें कोणाच्या स्वप्नांतही नव्हतें....हे बुद्धीनें तिखट होते म्हणून छापखान्याच्या संबंधाच्या हरएक कामांत ते इतके प्रवीण झाले होते कीं या इलाख्यांतल्या छापखान्यांचे मूळ पुरुष जे टामस ग्राहाम त्यांनींही पुढें पुढें मि० जावजींच्या पुढें हात टेंकले होते....त्यांची जरी हल्लीं भरभराट झाली तरी आरंभींच्या आपल्या बरो-

वरीच्या लोकांशीं ते मोठ्या ममतेनें व एकेरीनें वागत होते. त्यांच्या जुन्या मित्रांपैकीं अगदीं गरीब स्थितींत असणारे लोक त्यांस अजून अरेजारे म्हणत, व तें त्यांचें अरेजारे त्यांस आवडतही असे.

**केसरी**—जावजी दादाजी हे अगदीं पांच रुपयांच्या नौकरीपासून आपल्या उद्योगानें व श्रमानें भरभराटीस आले होते.....जावजी यांचा स्वभाव मेहनती व मनमिळाऊ असून त्यांस कोणत्याही प्रकारचें दुर्व्यसन नसल्यामुळें त्यांच्या धंद्यांत ते लौकरच उदयास आले..... टाइपांचीं नवनवीं वळणें व नवनव्या तऱ्हा काढून त्यांत त्यांनीं पुष्कळ सुधारणा केली. व पुढें स्वतःचा कारखाना काढून सुबक काम कसें करावें, याचाही आपल्या लोकांस कित्ता घालून दिला. यांचा स्वभाव जात्याच परोपकारी असल्यामुळें या इलाख्यांत तरी पुष्कळांवर त्यांच्या हातून उपकार घडले आहेत. ग्रंथकार, छापखानेवाले, अगर पत्रकार यांस जावजींचा थोडाबहुत तरी आश्रय मिळेच.

**सुबोधपत्रिका**—रा० जावजी यांच्या अंगीं सौजन्य, विनय व परोपकारबुद्धि, हे गुण चांगल्या प्रकारें वसत होते, व त्यांच्या नेहमींच्या आचरणांत ते व्यक्त होत असत, व याचमुळें ते इतके लोकप्रिय झाले होते. त्यांच्या परिचयांतील कितीएक गरीब निराश्रित कुटुंबवत्सलांस व विद्यार्थ्यांस द्रव्यद्वारें व पुस्तकरूपानें ते मदत करीत असत. यांच्या वर्तनसंबंधानें साधेपणाची लक्षांत ठेवण्याजोगी दुसरी एक गोष्ट अशी आहे कीं, त्यांनीं जरी बहुत पैका व वैभव मिळविलें तथापि त्यांनीं आपला मूळच्या पोषाकाचा साधेपणा सोडला नाहीं, किंवा गाडीघोड्यांच्या चैनींत पैशाचा अपव्यय केला नाहीं.....यांच्या मरणानें मुंबई इलाख्यांतील छापखान्याच्या कलेच्या सर्व खात्यांत पूर्ण माहितगार व मर्मज्ञ असे एक गृहस्थ नाहींसे झाले.

**केरळकोकिळ**—

## आर्या.

वैराग्यशास्त्रविरहित पुतळा जो शुद्ध साधुरीतीचा<br>
नीतीचा सागर तो भोक्ता सत्संगमाधुरी तीचा. १.

झाला न शिकुनि बी. ए. नाहीं कीं वेदशास्त्रही पढला<br>
लढला प्रयत्नशस्त्रें सन्मार्गें श्रेष्ठतेप्रती चढला. २.

उद्योगसत्यविनयें मानवला फार फार लोकांला<br>
तो काला वश होतां पात्र नव्हे विषय काय शोकाला. ३.

वागूं जनांत कैसा दारजनांचें भरूं कसें पोट<br>
पुसतां कोणीं मजला दाविन मी जावजींकडे बोट. ४.

सत्य महापुरुषानें सत्कृतिनें दाविलें जनां वळण
पोकळ अन्यजनांसम वक्तृत्वाचें न घातलें दळण. ५.

दीनबंधु—मध्यें कोणी रा० रा० गां० ह्यांनीं म्हटलें आहेः—

## आर्या.

हें भूमि जे तियेला उचित खरें नाम मृत्युभूमि असें
परिणाम मरण यास्तव नरही घे आपणास मर्त्य असें. १.
रडणें कां तोषचि हो नाकातें जावजी सुनर गेला,
मेघ जसा जाय समीं जलवर्षावोपकार करुन भला. २.
शमदम अंगीं, सन्मति अपाप अन्योपकार कृति ज्याची
जातो खरोखरचि तो नर परलोकांत सद्गतीलाची. ३.
वरवी शांतिसुखातें या मानवपुंगवात्मना देवा,
जीवें भावें मी तुज प्रार्थितसें पावु हा तुला धांवा. ४.
दावीं तत्तनयांतें सकल सुखांचे बरे बहू दिवस,
दाता सकल सुखांचा तूं सुखधामचि दयानिधी खास. ५.
जीं सत्कुलें सन्मत सुखदच तीं बांधवद्वयाकडुनी
सतत अवश्य घडावीं हें दे मी मागतों तुला नमुनी. ६.

असें आपापल्या परी सगळ्या लहानमोठ्या वर्तमानपत्रकर्त्यांनीं कैलासवासी जावजी शेट ह्यांजविषयीं लिहिलें आहे. त्यांचे लेख लांब लांब आहेत; आणि ते पुष्कळांचे आहेत. त्यांतलीं हीं निवडक वाक्यें येथें घेतलीं आहेत. त्या लेखांचा साद्यंत समावेश करण्यास आह्मांस येथें सवड नाहीं. ह्याबद्दल आह्मांस फार वाईट वाटतें.

अशा प्रकारचे लेख आजपर्यंत अनेकांविषयीं आले आहेत; आणि ते सगळे यथायोग्य आहेत. पण, इतरांमध्यें आणि ह्या प्रस्तुतच्या लेखांमध्यें एक मोठें अंतर आहे. तें हें कीं, जावजींची

स्तुति करण्यामध्यें मतभेद तिळभरही कोठें दिसत नाहीं. त्यांच्या गुणांचें वर्णन करण्यांत "परंतु"स मुळींच कोठें जागा नाहीं. ह्यास मुख्य कारणें दोन आहेत. त्यांतलें एक कारण हें कीं, त्यांनीं स्वप्रयत्नानें ज्या कलेचा उद्धार केला, ती कला अशी आहे कीं, तिच्या उपयुक्ततेविषयीं आणि चांगुलपणाविषयीं कोठेंही मतभेद नाहीं. आणि दुसरें कारण असें कीं, धर्म, आचारविचार, इत्यादि जे विषय वादग्रस्त आहेत, आणि ज्या विषयांच्या संबंधानें आमच्यांत सध्या अनेक फळ्या आणि तट झाले आहेत, त्या विषयांपासून ते अलिप्त होते. ह्याचा अर्थ, ह्या विषयांत ते मुळींच नव्हते असा नव्हे; तर, ते ह्या विषयांत पाऊल पुढें टाकतांना, आपल्या सगळ्या जातिबांधवांस आपणांबरोबर घेत असत; एकटे पुढें जात नसत. ही कला फार कठिण आहे. ही जावजी शेट ह्यांस चांगली साधली होती.

साधारणपणें ह्मटलें ह्मणजे वर्तमानपत्रकर्ते हे शाहाण्यांतले शाहाणे होत. त्यांनीं सर्वांनीं एकमतें, शुद्ध मनानें, आणि प्रेमभावानें जावजी शेट ह्यांस चांगलें ह्मटलें आहे. ह्यावरून जावजी शेट हे चांगल्यांतल्या चांगल्यांतले चांगले होते. ह्मणून आह्मी असें ह्मणतों कीं, त्यांच्या जन्माचें उत्तम सार्थक्य झालें आहे.